। धाराशिव । वर्ष २५ वे । अंक २५९ वा । सोमवार दिनांक २९ डिसेंबर, २०२५ । पृष्ठे ६ । किंमत ०१ ₹ RNI MAHMAR/2003/11649

# लातूर समाचार

(सांज दैनिक)
प्रकाशन: धाराशिव (उस्मानाबाद आवृत्ती)
पोष्ट परवाना L2/RNP/OMD- 52/24-26
dainiklatursamachar@gmail.com
संस्थापक : स्व. शंकर माधव जडे (स्वातंत्र्य सैनिक)

## क्राईम न्युज

### जिल्ह्यात अवैध मद्य विरोधी कारवाई

ढोकी (प्रतिनिधी)– पोलीस ठाणे अंतर्गत लताबाई रा. जयभवानीनगर पारधी पिडी ढोकी ता. जि. धाराशिव या दि.२६.१२.२०२५ रोजी तेरणा कारखाण्याचे बाजूला अंदाजे ३,५०० किंमतीची ३५ लिटर गावठी दारु अवैध विक्रीच्या उद्देशाने जवळ बाळगलेली जप्त करण्यात आली. तर फुलाबाई रा. जयभवानीनगर पारधीपीढी ढोकी ता. जि. धाराशिव या दि.२६.१२.२०२५ रोजी तेरणा कारखाण्याचे उत्तर बाजूस अंदाजे ४,००० किंमतीची ४० लिटर गावठी दारु अवैध विक्रीच्या उद्देशाने जवळ बाळगलेली जप्त करण्यात आली. यावरुन पोलीसांनी अवैध मद्य जप्त करुन नमूद व्यक्तीविरुध्द महाराष्ट्र मद्य मनाई कायदा कलम–६५(ई) अन्वये ढोकी पो ठाणे येथे स्वतंत्र २ गुन्हे नोंदविले आहेत.

वाशी पोलीस ठाणे अंतर्गत अतुल रा. निपाणी ता. भुम जि. धाराशिव हे दि.२६.१२.२०२५ रोजी हॉटेल शिवराज चे पाठीमागे राहत्या घरासमोर अंदाजे १,१२० किंमतीच्या देशी विदेशी दारुच्या १४ सिलबंद बाटल्या अवैध विक्रीच्या उद्देशाने जवळ बाळगलेल्या जप्त करण्यात आल्या. यावरुन पोलीसांनी अवैध मद्य जप्त करुन नमूद व्यक्तीविरुध्द महाराष्ट्र मद्य मनाई कायदा कलम–६५(ई) अन्वये वाशी पो ठाणे येथे गुन्हे नोंदविला आहे.

येरमाळा पोलीस ठाण अंतर्गत आकाबाई उर्फ दैवशाला रा.बरमाचीवाडी ता. कळंब जि. धाराशिव या दि.२६.१२.२०२५ रोजी आपल्या राहत्या घरासमोर अंदाजे २,८०० किंमतीची २७ लिटर गावठी दारु अवैध विक्रीच्या उद्देशाने जवळ बाळगलेली जप्त करण्यात आली. यावरुन पोलीसांनी अवैध मद्य जप्त करुन नमूद व्यक्तीविरुध्द महाराष्ट्र मद्य मनाई कायदा कलम–६५(ई) अन्वये येरमाळा पो ठाणे येथे गुन्हे नोंदविला आहे.

नळदुर्ग पोलीस ठाणे अंतर्गत राम रा.बाळेगाव ता.तुळजापूर जि. धाराशिव हे दि.२६.१२.२०२५ रोजी १२.२० वा. सु. आपल्या राहत्या शेडच्या बाजूला अंदाजे २,४०० किंमतीची ३० लिटर गावठी दारु अवैध विक्रीच्या उद्देशाने जवळ बाळगलेली जप्त करण्यात आली. यावरुन पोलीसांनी अवैध मद्य जप्त करुन नमूद व्यक्तीविरुध्द महाराष्ट्र मद्य मनाई कायदा कलम–६५(ई) अन्वये नळदुर्ग पो ठाणे येथे गुन्हे नोंदविला आहे

### घंटागाडीस लावली आग

तुळजापूर (प्रतिनिधी)– पोलीस ठाणे अंतर्गत सिंदफळ गावातील ग्रामपंचायत शेजारी सरकारी घंटागाडी क्र एमएच २५ एजे ५३४४ हीस अज्ञात व्यक्तीने आग लावून जाळून साठ हजार रुपयाचे नुकसान केले. अशा मजकुराच्या फिर्यादी मनोज उत्तम चौगुले दिलेल्या प्रथम खबरेवरुन पो ठाणे तुळजापूर गुन्हा नोंदवला आहे.

## हरभऱ्यावर घाटेअळीचा प्रादुर्भाव

### थंडी व ढगाळ वातावरणाचा फटका



कळंब थंडी वाढत चालल्याने रब्बी हंगामातील पिकांना फटका बसू लागला असून, कळंब तालुक्यात प्रामुख्याने हरभरा पिकावर घाटेअळीचा प्रादुर्भाव वाढत आहे. त्यामुळे हरभऱ्याच्या उत्पादनात घट होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

कळंब तालुक्यात हंगामी शेती करणाऱ्या शेतकऱ्यांची संख्या लक्षणीय आहे. खरीप व रब्बी हे दोन्ही प्रमुख पीक हंगाम असून विविध पिकांची लागवड केली जाते. तालुक्याचे एकूण भौगोलिक क्षेत्र ९६,०२० हेक्टर असून त्यापैकी ९२,२०६ हेक्टर क्षेत्र लागवडीखाली आहे. खरीप हंगामात सुमारे ७०,४०० हेक्टर, तर रब्बी हंगामात ६२,८०० हेक्टर क्षेत्रावर पिके घेतली जातात. तालुक्यातील शेतकऱ्यांची संख्या सुमारे ६५ हजार आहे.

यावर्षी खरीप हंगामात झालेल्या अतिवृष्टीमुळे सोयाबीन व इतर पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले. काही ठिकाणी सोयाबीन मिळाले असले तरी पाण्यामुळे ते काळे पडल्याने योग्य भाव मिळाला नाही. पेरणी, फवारणी व काढणीसाठी मोठा खर्च झाला; मात्र अपेक्षित उत्पन्न न मिळाल्याने खरीप हंगाम तोट्यात गेला. मात्र यंदा पावसाळा समाधानकारक झाल्याने विहिरी व नद्यांमध्ये चांगला पाणीसाठा उपलब्ध आहे. त्यामुळे रब्बी हंगामात चांगले उत्पादन मिळेल, अशी शेतकऱ्यांना आशा होती. रब्बीतील प्रमुख पीक असलेल्या हरभऱ्याची यंदा ४५ हजार हेक्टरपेक्षा अधिक क्षेत्रावर पेरणी झाली आहे. घाटेअळीचा वाढता प्रादुर्भाव सध्याच्या ढगाळ वातावरणामुळे हरभरा पिकावर घाटेअळीचा प्रादुर्भाव वाढताना दिसत आहे. अनेक ठिकाणी या किडीचा प्रादुर्भाव सुरू झाला आहे. चांगल्या पावसामुळे यंदा हरभऱ्याच्या लागवडीत वाढ झाली असली, तरी घाटेअळीमुळे पिकाचे नुकसान होत आहे. ही कीड बहुभक्षी असून विशेषतः फुलोरा व घाटे अवस्थेत अधिक नुकसानकारक ठरते. लहान अळ्या सुरुवातीला कोवळी पाने, कळ्या व फुले कुरतडतात. सध्या घाटे लागल्याने अळ्या घाट्यांना छिद्रे पाडून आतील दाणे खात असल्याचे दिसून येत आहे.

## २ वडिलांसह २ मुलांचा विजेच्या धक्क्याने मृत्यू: केशेगावमध्ये

### विहिरीतील पाईप काढताना विजेच्या धक्क्याने चौघांचा मृत्यू



अणदूर (प्रतिनिधी)– तुळजापूर तालुक्यातील केशेगाव येथे शेतातील विहिरीतून पाईप काढण्याचे काम सुरू असताना विजेचा धक्का बसून दोन कुटुंबातील पितापुत्रांचा जागीच मृत्यू झाला. ही दुर्दैवी घटना शनिवारी (दि. २७) दुपारी घडली. या घटनेने संपूर्ण परिसरात शोककळा पसरली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, केशेगाव (ता. तुळजापूर) शिवारातील गणपती शिवलिंग साखरे यांच्या शेतात विहिरीतील मोटार कप्पीच्या साह्याने बाहेर काढली जात होती. यावेळी कप्पीचा तोल गेल्याने जवळून जाणाऱ्या ११ केव्ही उच्चदाब विद्युत तारेस कप्पीचा वरचा भाग लागला. काही क्षणातच मोठा विद्युत प्रवाह शरीरातून गेल्याने चौघांचा जागीच मृत्यू झाला.

या भीषण दुर्घटनेत नागनाथ काशिनाथ साखरे (वय ५६) व त्यांचा मुलगा रामलिंग नागनाथ साखरे (वय २५), तसेच काशीम कोंडीबा फुलारी (वय ५४) व त्यांचा मुलगा रतन काशीम फुलारी (वय १७) यांचा मृत्यू झाला आहे. वडील–मुलगा अशा दोन कुटुंबांतील चार जण एकाच वेळी काळाच्या पडद्याआड गेल्याने घटनास्थळी उपस्थितांचे डोळे पाणावले. या दुर्दैवी घटनेमुळे साखरे व फुलारी कुटुंबांवर मोठा आघात झाला असून केशेगाव गावासह परिसरात सर्वत्र हळहळ व्यक्त केली जात आहे.

या दुर्दैवी घटनेमध्ये नागनाथ व रमिलंग व कासीम व रतन या पितापुत्राचा मृत्यू झाल्याने हळहळ व्यक्त केली जात आहे. साखरे व फुलारी या कुटुंबावर मोठा आघात झाल्याने संपूर्ण केशेगाव परिसरात शोककळा पसरली आहे.

## कळंबकरांच्या उपनगरध्यक्ष पदा कडे नजरा;

### उपनगराध्यक्षपदी शितल चोंदे यांची जनतेतून मागणी!



कळंब(प्रतिनिधी)– राज्यातील नगरपालिकांच्या निवडणुका पार पडल्या असून त्यामुळे आता प्रत्येकालाच पालिकेची पहिली बैठक कधी होणार याची उत्सुकता लागली आहे कळंब नगरपालिकेचे कारभारी सौ. सुनंदा ताई शिवाजी कापसे ह्या निश्चित झाल्या आहेत त्यामुळे आता नूतन नगरसेवकांना पालिकेची बैठक कधी होते याकडे शहरवासीयांचे नजरा लागल्या आहेत उपनगराध्यक्षपदी शितल चोंदे यांच्या नावाची शहरवासीया मधून मागणी होत असुन चर्चेला उधाण आले आहे.

येथील नगर परिषदेच्या सार्वत्रिक निवडणुकीत नगरपरिषदेच्या नगराध्यक्षपदी महायुतीच्या सौ.सुनंदा ताई कापसे २५५४ मताने विजयी झाल्या आहेत त्याचबरोबर महायुतीचे दहा नगरसेवक ही निवडून आणण्यात यश आले आहे तर शिवसेना ठाकरे गट व काँग्रेस यांच्या पदरात केवळ दहा नगरसेवक निवडून आणण्यात यश आले आहे मात्र दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा सुपडा साफ झाला आहे ही निवडणूक तिरंगी झाली होती मात्र दोन्ही राष्ट्रवादीना एकही नगरसेवक निवडून आणता आला नाही या नगरपरिषदेच्या नगराध्यक्ष पदासाठी सहा उमेदवार रिंगणात होते त्यात शिवसेना–भाजप महायुतीच्या सौ. राणी उर्फ सुनंदा ताई शिवाजी कापसे ह्या नगराध्यक्ष पदासाठी विजयी झाल्या आहेत तर उप नगराध्यक्ष पदासाठी शितल चोंदे यांच्या नावाला शहरात चांगलेच चर्चेला उधान आले आहे यावर पक्षश्रेष्ठी काय निर्णय घेतील याकडे सर्व शहरवासी यांचे लक्ष लावून राहिले आहे.

## स्त्रीमुक्ती म्हणजे समारंभ नव्हे, संघर्ष आहे! -स्त्रीमुक्ती दिन साजरा




धाराशिव (शीला उंबरे–पेंढरकर)– स्त्री मुक्ती दिन हा केवळ औपचारिक कार्यक्रम नसून सामाजिक, राजकीय आणि मानसिक गुलामगिरीविरोधातील संघर्षाचा दिवस आहे, असे ठाम प्रतिपादन करत वंचित बहुजन महिला आघाडी, धाराशिव यांच्या वतीने स्त्रीमुक्ती दिन साजरा करण्यात आला.

या कार्यक्रमात कुटुंबाचा गाडा हाकत सामाजिक व राजकीय क्षेत्रात सातत्याने कार्य करणाऱ्या महिलांचा डॉ. यशवंत मनोहर लिखित डॉ. बाबासाहेबांनी मनुस्मृती का जाळली हे पुस्तक देऊन सन्मान करण्यात आला. या सन्मानातून महिलांच्या कार्याचा गौरव तर करण्यात आलाच, शिवाय आजही समाजात रुजलेल्या मनुवादी मानसिकतेवर थेट प्रहार करण्यात आला.

यावेळी भारतीय बौद्ध महासभा, धाराशिव जिल्हा उपाध्यक्ष आयु. शिलाताई चंदनशिवे, सामाजिक कार्यकर्त्या अर्चनाताई अंबुरे, उषाताई पवार, विजयश्री कुंडगीर यांच्यासह विविध क्षेत्रात कार्यरत महिलांचा सन्मान करण्यात आला.

कार्यक्रमाचे नेतृत्व वंचित बहुजन महिला आघाडी जिल्हाध्यक्षा अनुराधाताई लोखंडे यांनी केले. तर जिल्हा महासचिव रुक्मिणी बनसोडे, लक्ष्मीताई गायकवाड, सुरेखाताई गंगावणे, लोचनाताई भालेराव, सुजाताताई बनसोडे, खुणेताई आदी महिला पदाधिकारी उपस्थित होत्या.

कार्यक्रमात बोलताना वक्त्यांनी स्पष्ट शब्दांत सांगितले की, डॉ. बाबासाहेबांनी मनुस्मृती जाळली, पण तिची मानसिकता अजूनही समाज, प्रशासन आणि राजकारणात जिवंत आहे. स्त्रीमुक्ती फक्त भाषणांपुरती न राहता निर्णय प्रक्रियेत महिलांना समान अधिकार दिले गेले पाहिजेत.

याप्रसंगी फुले–आंबेडकर विद्वत सभा राज्य समन्वयक प्रा. डॉ. शहाजी चंदनशिवे, वंचित बहुजन आघाडी जिल्हा महासचिव धनंजय सोनटक्के, उपाध्यक्ष भाऊसाहेब अणदुरकर, धाराशिव शहराध्यक्ष नामदेव वाघमारे, शेखर बनसोडे, आकाश भालेराव, महादेव एडके, अंबूरे सर यांच्यासह सामाजिक व राजकीय क्षेत्रातील अनेक कार्यकर्ते व पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या माध्यमातून स्त्री सन्मानापुरता नव्हे तर स्त्री सक्षमीकरणासाठी संघर्ष अधिक तीव्र करण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला.

## समाजसेवेला सातत्याची साथ : रोटरी सेवा ट्रस्टतर्फे अन्नपूर्णा संस्थेला ५१ हजारांची मदत



धाराशिव (प्रतिनिधी)– समाजातील सेवाभावी उपक्रमांना सातत्याने बळ देणारी रोटरी सेवा ट्रस्ट, धाराशिव ही संस्था सामाजिक दायित्वाची जाणीव ठेवत विविध सेवाभावी संस्थांच्या पाठीशी खंबीरपणे उभी राहत आहे. याच परंपरेत अन्नपूर्णा संस्थेच्या १० व्या वर्धापन दिनानिमित्त रोटरी सेवा ट्रस्ट व रोटरी क्लब धाराशिव यांच्या वतीने ५१,०००/– रुपयांचा धनादेश प्रदान करण्यात आला.

सन २०१५ मध्ये सुरू झालेली अन्नपूर्णा संस्थेची अन्नदान सेवा आज दहा वर्षांचा टप्पा पूर्ण करत असून, या कालावधीत सुमारे १५ लाख गरजूंनी भोजनाचा लाभ घेतला आहे. विशेषतः सिव्हिल हॉस्पिटल, धाराशिव येथील रुग्ण व त्यांच्या नातेवाइकांसाठी दररोज ३०० ते ४०० जणांना अन्नदान करण्याचे महत्त्वपूर्ण कार्य ही संस्था करीत आहे.

अन्नदानाबरोबरच रक्तदान, स्वर्गरथ सेवा, गोशाळा अशा विविध सामाजिक उपक्रमांनाही अन्नपूर्णा संस्था चालना देत असून, कोरोना महामारीसारख्या कठीण काळातही संस्थेने उत्तम कार्य केले आहे.

धनादेश प्रदान करताना रोटरी अध्यक्ष रो. रणजित रणदिवे, सचिव रो. प्रदीप खामकर, रोटरी सेवा ट्रस्टचे सचिव पी. आर. काळे, रो. प्रदिप मुंडे, रो. सुनील गर्जे व रो. कुणाल गांधी उपस्थित होते.

रोटरी सेवा ट्रस्ट धाराशिव ही संस्था समाजातील गरजू घटकांसाठी कार्य करणाऱ्या संस्थांना आर्थिक, नैतिक व सामाजिक पाठबळ देत असून, सेवा हाच खरा धर्म या भावनेतून लोकहिताचे उपक्रम सातत्याने राबवत आहे. अन्नपूर्णा संस्थेसारख्या सेवाभावी उपक्रमांना दिलेले सहकार्य हे रोटरी सेवा ट्रस्टच्या सामाजिक बांधिलकीचे उत्तम उदाहरण असल्याचे मत यावेळी व्यक्त करण्यात आले.

## वीस वर्षीय मुलीवर लैंगीक अत्याचार

परंडा (प्रतिनिधी)– पोलीस ठाणे अंतर्गत २० वर्ष मुलगी दि.१९.१२.२०२५ रोजी हिस गावातील एका तरुणाने दवाखान्यात बोलावून घेवून तिस फुल लावून किंवा लग्नाचे आमीष दाखवून व लैंगीक अत्याचारासाठी कोठेतरी डांबुन ठेवले आहे. अशा मजकुराच्या पिडीतेची आई यांनी दि.२६.१२.२०२५ रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन भा.न्या. सं.कलम–१३७, १३८, ८७, १२८, ६४,३५१ अन्वये गुन्हा नोंदवला आहे

## 'तडजोड शुल्क'वसुल

धाराशिव (प्रतिनिधी)– धाराशिव शहर वाहतुक शाखा व संबंधीत पोलीस ठाण्यांनी महत्त्वाच्या रस्त्यांवर दि.२६ डिसेंबर रोजी मोटार वाहन कायदा–नियम भंग प्रकरणी एकुण २४९ कारवाया करुन १,९७,९५० 'तडजोड शुल्क'वसुल केले आहे.

ओ३म् भूर्भुवः स्वः ।
तत्सवितुर्वरेण्यं भर्गो देवस्य धीमहि ।
धियो यो नः प्रचोदयात् ।।

# लातूर समाचार

## बांगलादेशातील परिस्थिती भयाण

बांगला देशातील परिस्थिती हिंदुसाठी भयाण आहे. वरचेवर परिस्थिती चिघळत आहे. हिंदुची दिवसा हत्या करून जाळले जात आहे. एकप्रकारे दहशद निर्माण करण्याचा हा जात्याधांचा प्रयत्न आहे. कोणताही धर्म हा हिंसा शिकवित नाही. तसा धर्माग्रंथात लिहीले नाही. मात्र धर्माच्या नावावर जो हिंसा करण्यात येत आहे ती वेळीच रोखली पाहिजे. यासाठी धर्माचे ठेकेदार आहेत ते पुढे आले पाहिजे. शांततेचे आवाहन केले पाहिजे. बांगला देश हा भारतामुळे स्वतंत्र झाला. भारताचे मोठे योगदान आहे. भारताचा एक भुभाग असणाऱ्या देशात जर भारतीय हिंदुची हत्या होत असेल तर योग्य नाही. या घटनेवरून भारतीय देशातील नागरिक मग कोणत्याही जातीचे असोत ते पेटून उठले पाहिजेत. पाकिस्तानात जे घडत होते तेच बांगला देशात घडत आहे. हिंदुवर अत्याचार व हिंसात्मक प्रकार होत असतील तर यावर कडक उपायोजनाची मोठी गरज आहे. भारतात असंख्य हिंदु बरोबर इतर समाज राहातो आहे. असे असताना हिंदुचे लक्ष्य केले जात असेल तर ते योग्य नाही. एखाद्याला मारहाण करून चौकशी अंती दोशी असेल किंवा देशविरोधी कारवायात गुंतला असेल तर शिक्षा कायद्याने दिली पाहिजे. पाकिस्तान मध्ये जे घडत होते तेच बांगला देशाला उघड घडत आहे. हिंदु भारतात कोणावरही अन्याय अत्याचार करीत नाहीत केले तर कायद्याने त्याला शिक्षा भोगावी लागते. त्यामुळे इतर राष्ट्रापेक्षा भारत कधीही चांगला आहे हे अहिंदुना कधी कळेल? त्यामुळे बांगला देशात सध्याला चालू असलेल्या हिंदुवरील अत्याचार रोखला पाहिजे. हा अत्याचार जगाला दिसून येत नाही का? भारतात एखाद्या अहिंदुवर अन्याय झाला तर मानवाधिकार असो किंवा त्यांचे जवळचे भारत सोडून जाण्याची वेळ आली आहे असे वक्तव्य करतात. ते भारत सोडून जात नाहीत तर भारतात विष कालविण्याचे काम करतात. माणुसकीला काळीमा फासणारी घटना बांगला देशात घडत आहे. अतोनात हिंदुवर अन्याय, अत्याचार होत आहेत. हे भारतात राहाण्यास कळत नाही का? यापुर्वी बांगला देशात एका साधुला जेलमध्ये डांबले, त्रास दिला. हिंदु म्हणजे माणसे नाहीत का? त्यामुळे याप्रकरणाकडे मानवतेच्या दृष्टिने लक्ष दिले पाहिजे. हिंदुवरील अत्याचार रोखले पाहिजेत. बांगला देशात जे बहुसंख्य समाज आहे तोही जगा बरोबर भारतात आहे याचा विचार बांगला देशातील नागरिकांनी केला पाहिजे. बांगला देशात एवढी वाईट घटना झाली तरी कोणी तरी उठाव केला नाही, निषेध केला नाही. गप्प आहेत, जसे मरणारा हा माणूस नव्हता तर पशु होता अशा तोऱ्यात दिसत आहे. भारतात किमान या घटनेची निंदा केली पाहिजे होती. अजूनही बांगला देशात हिंदुना जगणे आवघड झाले आहे. जीव मुठीत घेऊन महिला, मुली जीवन जगत आहे. हिंदुकुटुंबियाच्या मनात भीतीचे वातावरण दिसून येत आहे. हिंदुना जगणे कठिण झाले आहे. भारतीय बॉर्डरवर हिंदु भारतात येण्यसाठी ठाम मांडून आहे. एवढे हिंदु बांगलादेशात भयभीत झाला आहे. एखाद्या समाजावर दुसरा अन्याय, अत्याचार करीत असेल तर जगात आवाज उठविला पाहिजे. वास्तविक भारत सरकारने काही तरी दखल घेतली पाहिजे. पंतप्रधान व गृहमंत्र्याची लक्ष घालुन बांगलादेशातील हिंदुचे संरक्षण दिले पाहिजे. ज्यावेळी बांगला देशाची निर्मिती झाली. त्यावेळी माजी पंतप्रधान दिवंगत इंदिरा गांधी यांना सुद्धा वाटले नसेल नंतर हा बांगला देश गद्दार निघेल. हिंदुवरच अत्याचार करेल. परंतु आज बांगला देश हिंदुच्या जीवावर उठला आहे. मानवता विसरली आहे. या प्रकरणी एकदा भारत देश पेटला तर बांगला देशाला जाळून टाकल्याशिवाय राहणार नाही. मुळात बांगला देशाची निर्मिती भारताच्या मदतीने झाली आहे हे बांगलादेशी विसरले आहेत. आज पाकिस्तानची स्थिती कशी झाली आहे. त्याच प्रमाणे बांगला देशाची झाली आहे. वास्तविक बांगला देशवाशीयांनी भारतीय हिंदुची हत्या, अन्याय व अत्याचार करणे सोडून दिले पाहिजे. तसे पाहिले तर बांगला देश तेथील राज्यकर्ते एकत नसतील तर एकदा हात दाखविलाच पाहिजे. त्यांचे वंशज सर्वत्र आहेत हे विसरून चालणार नाही. त्यामुळे बांगला देशीतील जे हिंदुविरोधी आहेत त्यांनी लक्षात घेऊन पावले उचलली पाहिजेत. हिंदु हा कोणावर अन्याय, अत्याचार करणारा नाही. तरी बहुसंख्य बांगलादेशिय मुस्लिम हा हिंदुवर अत्याचार करीत आहेत. पहिल्यांदा साधुना मारहाण केली. आता तर ठार मारून, पेटवुन दिले. हा क्रुरपना आहे. मानवतेला काळीमा फासणारा आहे. त्यामुळे धर्माच्या नावावर असे घडत असेल तर धर्मगुरुंनी जाहिर सांगितले पाहिजे की, हत्या करणे योग्य नाही. मानवतेची ही शिकवण नाही. असे बांगला देशातील काय जगातील ईस्लाम धर्म गुरुंनी पटऊन सांगितले पाहिजे. नसता बांगला देशातील जनतेची आवस्था बिकट होऊ शकते. हिंदुचे बांगलादेशात कशातच ढवळा-ढवळ करीत नाही. उलट मदत करीत आहे. विकासात हातभार लावित आहे. असे असताना केवल द्वेश भावनेने हिंसा करीत असतील तर ते योग्य नाही. बांगलादेशीय कट्टरतावादीने हिंदुवरील अत्याचार थांबविले पाहिजेत. नसता एकदा भारताचे पंतप्रधान यांनी मनावर घेतले तर मोठी किंमत चुकवावी लागणार आहे. सतत हिंदु म्हटले की, हिंदुच्या कुटुंबियावर अत्याचार चालू आहेत. हिंसा व क्रुरतेचा कळस काठला आहे. त्यामुळे आता भारतीयांनी याकडे लक्ष देऊन बांगला देशाला चांगलेच समजावुन सांगितले पाहिजे. एखादे हिंदुबचाव ऑपरेशन केले पाहिजे. आज बांगला देशातील स्थिती खराब आहे. आरजकता माजली आहे. याचा विचार करून भारताने केलेले उपकार न विसरता मदत केली पाहिजे. हिंदुवर अत्याचार वाढले आहेत. हे सर्वांना कळाले आहेत. त्यामुळे वेळीच थांबविले पाहिजे.

# महसूली शब्दांचे अर्थ जाणून घेऊया!

महसूल विभाग हा प्रशासनाचा कणा म्हणून ओळखला जातो. महसूल विभागाच्या सेवा प्रभावीपणे व पारदर्शकरित्या नागरिकांपर्यंत पोहोचविण्यासाठी कामकाजात ई-प्रणालीचा वापर होत आहे. सातबारा उतारा, फेरफार नोंद, विविध परवानग्या, शासकीय जमीनीचे व्यवस्थापन, शस्त्र परवाना, कर वसुली, नैसर्गिक आपत्तीमध्ये मदत व पुनर्वसन कार्य या विभागामार्फत चालते. महसूल विभाग हा नागरिकांचा जिव्हाळ्याचा विभाग असला तरी यातील काही शब्दांचे अर्थ समजून घेताना क्लिष्ट वाटतात. या लेखाच्या माध्यमातून विभागाशी संबंधित कामाशी निगडीत अशाच काही शब्दांचे अर्थ जाणून घेऊया !

**निस्तारपत्रक**

निस्तारपत्रक म्हणजे गावातील सर्व सार्वजनिक जमिनींच्या वापराबाबतचा अधिकृत नकाशा व नियमांची यादी. गावात ज्या जमिनी वैयक्तिक मालकीच्या नसतात जसे की तलाव, रस्ते, नदीकाठची जमीन, स्मशानभूमी, चराई जमीन, सार्वजनिक जागा त्या जमिनींचा कशासाठी आणि कसा वापर करायचा याची संपूर्ण योजना या पत्रकात दिलेली असते.

**निहित**

निहित म्हणजे जमीन किंवा मालमत्ता एखाद्या व्यक्तीला किंवा संस्थेला वापरासाठी देणे, परंतु मालकी हक्क न देणे. ज्या व्यक्तीकडे जमीन निहित केली जाते, त्याची स्थिती कनिष्ठ धारकासारखी असते. म्हणजेच तो जमीन फक्त दिलेल्या मर्यादेत वापरु शकतो.जमीन ज्या विशिष्ट कारणासाठी निहित केली आहे ते काम किंवा उद्देश शासनाच्या परवानगीशिवाय बदलता येत नाही.

**निखात निधी**

निखात निधी अर्थात जमिनीखाली लपलेला किंवा दडलेला मौल्यवान खजिना जसे की दागिने, सोने- चांदीची नाणी किंवा रुपये किंवा मौल्यवान वस्तू. जमीन नांगरताना, खोदताना किंवा काम करताना असा मौल्यवान खजिना सापडता तर भारतीय निखात निधी कायदा १८७८ नुसार सरकारला कळविणे तसेच पुढील प्रक्रिया करणे आवश्यक असते.

**कनकूत**

कनकूत म्हणजे शेतातील उभ्या पिकाच्या उत्पादनाचा अंदाज लावण्याची महसूली पद्धत. यामध्ये पिकाची वाढ, दाण्यांची संख्या आणि पिकाची एकूण घनता यासारख्या घटकांचा विचार करुन कापणीनंतर किती उत्पादन मिळेल याचा अंदाज घेतला जातो.

**जिन्नसवार**

जिन्नसवार म्हणजे गावात घेतल्या जाणाऱ्या मुख्य पिकांची अधिकृत नोंद. गावात कोणती पिके जास्त प्रमाणात घेतली जातात, कोणते पीक त्या भागाचे प्रमुख उत्पादन मानले जाते, याची माहिती या यादीत असते. ही नोंद महसूल नोंदीसाठी उपयुक्त ठरते.

**वरसाल**

एखाद्या व्यक्तीचा मृत्यू झाल्यावर किंवा त्याने मृत्यूपत्र लिहून ठेवले असल्यास, त्या आधारावर मालमत्तेची नावात होणारी बदल नोंद म्हणजे वरसाल.

**पारडी जमीन**

पारडी जमीन म्हणजे गावठाणातील घरांच्या लगत किंवा सभोवती असलेली, शेतीयोग्य पण मुख्यत: घराशी संबंधित वापरात येणारी लागवडीची जमीन.

**स्वामित्वधन**

जमिनीचा पृष्ठभाग कोणच्याही मालकीचा असला तरी त्याखालील खनिजे शासनाच्या मालकीची असतात. कोणत्याही व्यक्तीस अशा खनिजाचे उत्खनन करुन त्याचा उपयोग करावयाचा असल्यास त्यास त्या खनिजांचे स्वामित्वधन (रॉयल्टी) शासनास द्यावे लागते. तसेच त्यावर स्थानिक उपकरही भरावे लागतात.

**संकलन :**
**विभागीय माहिती कार्यालय, पुणे**

# काळे मनुके खाण्याचे ६ जबरदस्त फायदे, जाणून वाटेल आश्चर्य



मनुका हे पोषक तत्वांनी समृद्ध असलेले एक चविष्ट ड्रायफ्रूटआहे. त्यात लोह, पोटॅशियम, मॅग्नेशियम, तांबे आणि इतर अनेक खनिजे भरपूर प्रमाणात असतात. मनुका अनेक जीवनसत्त्वांचा देखील चांगला स्रोत आहे. मनुका अनेक रंगात येतात. ज्यामध्ये लाल आणि काळा सर्वात सामान्य आहे.

निरोगी राहण्यासाठी प्रत्येकाने मनुका खाव्यात. पण बहुतेक लोकांना प्रश्न पडतो कि, कोणते मनुके आरोग्यासाठी जास्त फायदेशीर आहेत. त्यामुळेच आज आपण काळे मनुके खाण्याचे फायदे जाणून घेऊया..

**पचनक्रिया सुधारण्यास मदत–**

काळ्या मनुकामध्ये फायबर आणि विविध पौष्टिक गुणधर्म असतात जे बद्धकोष्ठता दूर करण्यास मदत करतात. त्यात असलेले फायबर पचनास प्रोत्साहन देते आणि पोटफुगी रोखते.

**हाडे मजबूत होतात–**

काळ्या मनुकामध्ये बोरॉन आणि कॅल्शियम असते. जे हाडे मजबूत करण्यास मदत करते. हे हाडांच्या निर्मितीला प्रोत्साहन देते आणि कॅल्शियमचे शोषण वाढवते.

**केस आणि त्वचेसाठी फायदेशीर**

चमकदार त्वचा आणि दाट केस हवे असतील तर,तुमच्या आहारात काळे मनुका समाविष्ट करा. ते अँटीऑक्सिडंट्स, जीवनसत्त्वे आणि लोहाने समृद्ध आहे. जे रक्ताभिसरण सुधारते आणि त्वचेच्या पेशींच्या पुनरुत्पादनास मदत करते. लोह केस गळणे कमी करते आणि हिमोग्लोबिनची पातळी वाढवते.

**वजन कमी करण्यास उपयुक्त–**

काळ्या मनुकामध्ये फायबरचे प्रमाण जास्त असते. जे भूक नियंत्रित करते आणि वजन कमी करण्यास मदत करते. त्यातील नैसर्गिक गोडवा गोड खाण्याची इच्छा नियंत्रित करण्यास मदत करते.

**डायबिटीससाठी फायदेशीर–**

काळे मनुका खाल्ल्याने रक्तातील साखरेची पातळी नियंत्रित होते. नैसर्गिक गोडवा असूनही, त्यांचा ग्लायसेमिक इंडेक्स कमी असतो आणि रक्तातील साखरेची पातळी मध्यम प्रमाणात नियंत्रित होते.

**रोगप्रतिकारक शक्ती वाढते–**

मनुकामध्ये अँटीऑक्सिडंट्स असतात जे शरीराला हानिकारक फ्री रॅडिकल्सपासून वाचवतात आणि संसर्ग रोखतात. नियमित सेवनाने सर्दी आणि खोकला यासारख्या सामान्य आजारांपासून बचाव होऊ शकतो.

# शरीरातील वेगवेगळ्या व्हिटॅमिन्सची कमतरता दूर करतात 'हे' पदार्थ, आहारात करा सामील

चांगल्या आरोग्यासाठी आपले अन्न पौष्टिक आणि पोषक तत्वांनी समृद्ध असले पाहिजे. आपले शरीर तंदुरुस्त आणि निरोगी ठेवण्यासाठी, आपण आपल्या आहारात व्हिटॅमिनयुक्त पदार्थांचा समावेश केला पाहिजे. निरोगी अन्नासोबतच, त्यात असलेल्या व्हिटॅमिन्सचा विचार करणेदेखील महत्त्वाचे आहे.

याकडे दुर्लक्ष केल्याने अनेक आरोग्य समस्या उद्भवू शकतात. शरीराला ए, बी, सी, डी, के आणि ई व्हिटॅमिन्स आवश्यक असतात. या प्रत्येकव्हिटॅमिन्सचे शरीरासाठी वेगवेगळे फायदे आहेत. तुम्ही तुमच्या आहारात सर्व प्रकारच्या व्हिटॅमिन्सचा समावेश केला पाहिजे. आज आपण आहारात व्हिटॅमिन्स कसे सामील करायचे जाणून घेऊया.




टोमॅटो–

तज्ज्ञांच्या मते, व्हिटॅमिन सी ने समृद्ध असलेले टोमॅटो कोणत्याही पदार्थात किंवा सॅलडमध्ये वापरावेत. तुम्ही तुमच्या रोजच्या आहारात नियमितपणे टोमॅटोचा समावेश करणे फायदेशीर ठरते. दररोज टोमॅटो खाल्ल्याने शरीरात व्हिटॅमिन सीची कमतरता होत नाही.

हिरव्या भाज्या–

हिरव्या भाज्यांमध्ये सर्व प्रकारचे व्हिटॅमिन आणि पोषक तत्वे असतात. हिरव्या भाज्यांव्यतिरिक्त, इतर भाज्या देखील तुमच्या आहारात समाविष्ट केल्या जाऊ शकतात. अशा प्रकारे, तुम्ही तुमच्या आहारात व्हिटॅमिन के समृद्ध असलेले पदार्थ समाविष्ट करू शकता. याव्यतिरिक्त, जर तुम्हाला कोणत्याही प्रकारची ॲलर्जी असेल तर तुम्ही तुमच्या आहारतज्ञ किंवा डॉक्टरांचा सल्ला घेऊ शकता.

दूध–

कॅल्शियमचा चांगला स्रोत मानला जाणारा दूध व्हिटॅमिन ए ची कमतरता पूर्ण करण्यास देखील मदत करतो. चांगले आरोग्य राखण्यासाठी दररोज किमान एक ग्लास दूध पिणे आवश्यक आहे.

मासे–

मासे हे ओमेगा-३ फॅटी ॲसिड आणि अनेक जीवनसत्त्वांचा स्रोत आहे. तुमच्या आहारात त्याचा समावेश केल्याने एक संपूर्ण, निरोगी आहार तयार होऊ शकतो. शिवाय अनेक आरोग्य समस्या दूर होऊ शकतात.

रताळे–

रताळे व्हिटॅमिन ए ने समृद्ध असतात. तुम्ही भाजलेले किंवा उकडलेले रताळे आरामात खाऊ शकता. परंतु तळलेले रताळे खाणे टाळा. त्यामुळे वजन वाढते.

# मुलांची हाडे लोखंडासारखी होतील टणक, मुलांच्या 'या' १ सवयीमध्ये करा बदल

मुलांनी निरोगी आणि सक्रिय राहण्यासाठी हाडे मजबूत असणे महत्वाचे आहे. लहान मुलांची अगदी कमी वयातच तब्बेतीची काळजी घेणे महत्त्वाचं आहे. कारण या वयात मुलांची योग्य वाढ झाली तर त्याचा सकारात्मक परिणाम मुलांच्या आरोग्यावर होतो. कॅल्शियम मुलांना दुधाच्या स्वरूपात दिले जाते, परंतु इतर स्त्रोतांकडे दुर्लक्ष केले जाते. ज्या मुलांची हाडे निरोगी आणि मजबूत बनवण्यासाठी खूप प्रभावी ठरू शकतात.

**उन्ह**

सूर्यप्रकाश हा व्हिटॅमिन डीचा नैसर्गिक स्रोत आहे, जो कॅल्शियम शोषण आणि हाडांच्या आरोग्यासाठी आवश्यक आहे. यासाठी तुम्ही तुमच्या मुलांना बाहेर उन्हात खेळायला पाठवणे गरजेचे आहे. विशेषत: सकाळी आणि दुपारी. नियमितपणे उन्हात खेळल्याने मुलांमध्ये व्हिटॅमिन डीचे प्रमाण लक्षणीयरीत्या वाढू शकते. त्यामुळे मुडदूस सारख्या हाडांच्या आजाराचा धोका कमी होतो.

**नाचणी आणि शेगळ्याचे सेवन**

हाडे मजबूत करण्यासाठी अनेक पदार्थ आहेत. ज्याचे सेवन करून आपण आपली हाडे मजबूत करू शकतो. नाचणीमध्ये मोठ्या प्रमाणात कॅल्शियम असते. एका संशोधनानुसार, नाचणीमध्ये इतर धान्यांपेक्षा दहापट जास्त कॅल्शियम असते. ड्रमस्टिक पाने हाडांच्या विकासासाठी आवश्यक असलेले कॅल्शियम आणि खनिजे समृध्द असतात. मुलांच्या आहारात या पदार्थांचा समावेश केल्यास त्यांच्या हाडांचा विकास होण्यास मदत होऊ शकते.

**योग**

प्राचीन काळापासून योगास खूप महत्त्व आहे. ज्यामुळे केवळ लवचिकता आणि संतुलन वाढते. वजन सहन करणाऱ्या आसनांमुळे हाडे मजबूत होतात. ट्री पोज आणि वॉरियर पोज यांसारख्या आसनांमुळे हाडांवर हलका दाब पडतो. ज्यामुळे हाडांची ताकद वाढते. एका अभ्यासात असे दिसून आले आहे की; नियमित योगाभ्यासामुळे मुलांमध्ये हाडांची घनता सुधारू शकते.

**तीळ बियाणे वापर**

तिळात कॅल्शियम आणि फॉस्फरस मुबलक प्रमाणात आढळतात. जे हाडांच्या निर्मितीसाठी महत्त्वाचे आहेत. एक चमचा तिळात आवश्यक पोषक तत्वे पुरेशा प्रमाणात असतात. तीळाचे नियमित सेवन केल्यास मुलांच्या हाडांची घनता सुधारते. यासाठी तिळाचा समावेश जेवणात किंवा नाश्त्यात करता येतो.

**व्यायाम**

हाडे मजबूत करण्यासाठी वजन उचलण्याचे व्यायाम विशेषत: प्रभावी आहेत. कारण ते हाडांच्या गुरुत्वाकर्षणाविरुद्ध काम करतात. याशिवाय उडी मारणे, धावणे आणि गिर्यारोहण यांसारख्या क्रियाकलापांमुळे हाडे मजबूत होतात.

**काही मसाल्यांचा वापर**

हळद आणि मेथी यांसारखे काही मसाले सामान्यत: स्वयंपाकात वापरतात, हाडे निरोगी ठेवण्यास मदत करतात. हळदीमध्ये कर्क्यूमिन असते, ज्यामध्ये दाहक-विरोधी गुणधर्म असतात, जे हाडांची घनता राखण्यास मदत करू शकतात.

# मुलांची उंची वाढवण्यासाठी प्रयत्न करताय? मग 'या' टिप्स फॉलो केल्यास भराभर वाढेल हाईट



बहुतेकांना कमी उंची आत्मविश्वास कमी करते. मुलांची उंची कशी वाढवायची याचा विचार अनेकजण करतात. साधारणपणे, अनुवंशशास्त्राचा उंचीवर मोठा प्रभाव असतो. परंतु हे पूर्णपणे खरे नाही. गर्भधारणेदरम्यान धूम्रपान, प्रसूतीनंतर बाळाची अयोग्य काळजी, जन्माचे वजन कमी असणे आणि बालपणात अशक्तपणा इत्यादी इतर कारणे देखील आहेत ज्यांचा उंचीवर मोठा परिणाम होतो. असे म्हटले जाते की उंची एका विशिष्ट वयापर्यंतच वाढते. परंतु संतुलित आणि पौष्टिक आहार, व्यायाम आणि नियमित योग आणि चांगल्या जीवनशैलीने सर्वकाही शक्य आहे. आज आपण उंची वाढवण्याचे काही सोपे उपाय जाणून घेऊया..

**पौष्टिक आहार–**

शरीराच्या वाढीसाठी निरोगी आहार आवश्यक आहे. तुम्ही मुलांच्या आहारात दूध, फळे, हिरव्या भाज्या, मांस आणि कार्बो हायड्रेट्स असलेले पदार्थ समाविष्ट करावेत. यामुळे हार्मोन्सना पोषक तत्वे मिळतात आणि शरीराची वाढ होण्यास चालना मिळते.

**भरपूर पाणी पिणे–**

पाण्याशिवाय निरोगी आहार अपूर्ण आहे. म्हणून मुलांना भरपूर पाणी प्यायला द्या. भरपूर पाणी प्यायल्याने शरीरातील विषारी पदार्थ बाहेर पडतात. ज्यामुळे वाढीस चालना मिळते.

**अश्वगंधा–**

अश्वगंधा या आयुर्वेदिक वनस्पतीमध्ये हाडांची घनता वाढवणारे अनेक खनिजे असतात. उंची वाढवण्याचा हा एक उत्तम मार्ग आहे. तुम्हाला कोणत्याही आयुर्वेदिक दुकानात अश्वगंधा मिळेल. एक ग्लास कोमट दुधात दोन चमचे अश्वगंधा मिसळा आणि तुमच्या आवडीनुसार साखर किंवा गूळ घाला. ते चांगले मिसळा आणि प्यायला द्या. दररोज रात्री झोपण्यापूर्वी ते सेवन करावे.

**सूर्यप्रकाश आवश्यक आहे–**

सूर्यप्रकाश हा व्हिटॅमिन डीचा एक उत्कृष्ट नैसर्गिक स्रोत आहे. उंची आणि सर्वांगीण विकासासाठी हे एक शक्तिशाली पोषक तत्व आहे. जर शरीराला पुरेसे व्हिटॅमिन डी मिळाले नाही तर हाडे कमकुवत होऊ लागतात आणि उंचीवर परिणाम होऊ शकतो. त्यामुळे मुलांना सूर्यप्रकाशात बसवा.

**नियमित योगासन करणे–**

योगासने केल्याने तुमचे शरीर निरोगी आणि मजबूत बनते. योगासनामुळे तुमचे स्नायू देखील मजबूत होतात. निरोगी शरीर राखण्यासाठी, उंचीसाठी दररोज ताडासन, वीरभद्रासन आणि भुजंगासन यांसारख्या योगासनांचा सराव करायला हवा. नियमित योगासन केल्याने तुमचे शरीर तंदुरुस्त आणि निरोगी राहते, जे तुमच्या आरोग्यासाठी देखील खूप फायदेशीर आहे.

**लटकण्याचे व्यायाम–**

मुलांची उंची वाढवण्यासाठी, दररोज लटकण्याचे व्यायाम करा कारण ते तुमची उंची वाढविण्यास मदत करतात. ते तुमच्या पाठीच्या स्नायूंना बळकटी देतात आणि पाठीच्या कण्यावरील दाब कमी करतात. यामुळे तुमचा पाठीचा कणा सरळ राहण्यास आणि तुमची उंची वाढण्यास मदत होते.

# नाडी शोधन प्राणायामचे फायदे जाणून घ्या



नाडी शोधन प्राणायाम हा सर्वात सोपा आणि प्रभावी तंत्रांपैकी एक मानला जातो. हा प्राणायाम केवळ श्वास संतुलित करत नाही तर मन आणि मेंदूला देखील फायदा देतो. निरोगी शरीरासाठी, योगासनासह प्राणायाम अत्यंत महत्व-ाचे आहे. शरीर आणि मनाच्या शुद्धीकरणासाठी योग आणि प्राणायाम हा एक चांगला पर्याय आहे. निरोगी व्यक्तीसाठी ज्याप्रमाणे संतुलित आहार आवश्यक आहे, त्याचप्रमाणे नियमितपणे योग आणि प्राणायाम करणे देखील तितकेच महत्वाचे आहे. यापैकी, नाडी शोधन प्राणायाम हा सर्वात सोपा आणि प्रभावी तंत्रांपैकी एक मानला जातो. हा प्राणायाम केवळ श्वास संतुलित करत नाही तर मन आणि मेंदूसाठी देखील फायदेशीर आहे.

हिवाळ्यात हे आसन अनेक समस्या दूर करते, कसे करायचे जाणून घ्या

शिवसेनेच्या नगरसेवकाच्या पतीच्या हत्येप्रकरणी रायगडमध्ये नऊ जणांना अटक

शास्त्रज्ञांनी रक्तातील साखरेला जीवनशैली कशी आकारते हे उघड केले

अधिक शिका

सर्व वयोगटातील लोकांच्या आरोग्यासाठी वरदान

हे नाडी शोधन प्राणायाम प्रत्येकाच्या आरोग्यासाठी वरदान मानले जाते. असे म्हटले जाते की हे आसन नियमितपणे केल्याने मनाला शांती मिळते, शांतीची भावना येते आणि एकाग्रता वाढते. मोरारजी देसाई राष्ट्रीय योग संस्थेने हे नाडी शोधन प्राणायाम कसे करायचे ते स्पष्ट केले आहे.

हिवाळ्यात श्वसनसंस्था मजबूत करण्यासाठी हे योगासन करा

नाडीशोधन प्राणायाम कसा करायचा ते शिका

तुम्ही येथे नाडी शोधन प्राणायाम करू शकता. सरावासाठी, सुखासन, पद्मासन किंवा खुर्चीवर बसा, तुमचा पाठीचा कणा सरळ ठेवा. उजव्या हाताच्या अंगठ्याने उजवी नाकपुडी बंद करा आणि डाव्या नाकपुडीतून हळूहळू आणि खोलवर श्वास घ्या. नंतर उजव्या हाताच्या अंगठ्याने आणि करंगळीने डावी नाकपुडी बंद करा आणि उजव्या नाकपुडीतून श्वास सोडा. नंतर उजव्या नाकपुडीतून श्वास घ्या आणि डाव्या नाकपुडीतून श्वास सोडा. हा क्रम पुन्हा करा. एक चक्र पूर्ण केल्यानंतर,

दोन्ही नाकपुड्यांमधून सामान्यपणे श्वास घ्या. सुरुवातीला, हा सराव ५ ते १० मिनिटे आणि हळूहळू करावा. सकाळी रिकाम्या पोटी हा सराव करणे चांगले मानले जाते.

विश्रामासनाचे फायदे जाणून घ्या

फायदे

हे तुम्हाला ताण कमी करण्यास मदत करते आणि चिंता पातळी देखील जलद कमी करते.

हे आसन नियमितपणे केल्याने खोकला आणि श्वसनाच्या समस्यांपासून आराम मिळतो.

हे इडा, पिंगला आणि सुषुम्ना नाडी शुद्ध करते आणि शरीरातील महत्वाची ऊर्जा संतुलित करते, ज्यामुळे मानसिक स्थिरता आणि ध्यानाची शक्ती वाढते.

जर तुम्ही नियमितपणे याचा सराव केला तर झोपेची गुणवत्ता सुधारते आणि तुम्ही दिवसभर ताजेतवाने राहता.

### खबरदारी -

या पद्धतीने नाडी शोधन प्राणायाम करणे आवश्यक असले तरी, काही खबरदारी देखील आवश्यक आहे. कधीही जबरदस्तीने हा प्राणायाम करू नका. श्वास घेणे आणि सोडणे पूर्णपणे सुरळीत आणि नैसर्गिक असावे. उच्च रक्तदाब, हृदयरोग किंवा गंभीर नाकाचा त्रास असलेल्या व्यक्तींनी योग प्रशिक्षकाचा सल्ला घ्यावा.

## (गुरु वचन) वास्तव्याची जाण



एका राज्याचा राजा दररोज सकाळी फेरफटका मारण्यासाठी जात होता. त्याला रस्त्यात जी व्यक्ती पहिल्यांदा दिसेल त्याची तो प्रत्येक इच्छा पूर्ण करायचा. असेच एका दिवशी निघाला असता त्याला एक ब्राह्मण भेटला. राजाने त्याला विचारले की, ब्राह्मण देवता मी आपली काय मदत करु. ब्राह्मण लाजून म्हणाला, महाराज आपण जे उचित समजाल त्यावर राजा म्हणाला, आपण सांगा काय पाहिजे. ब्राह्मणाच्या मनात लोभ आला. तो राजला म्हणाला, महाराज आपण फिरून या तोपर्यंत मी विचार करतो की, मला काय पाहिजे. ब्राह्मणाचे म्हणणे ऐकून राजा फिरण्यासाठी गेला. नंतर ब्राह्मणाच्या मनात विचार आला की, अशी संधी पुन्हा-पुन्हा मिळत नाही. एकदाच असे काही तरी मागतो की, पुन्हा कधी काही मागण्याची गरज पडणार नाही. राजा फिरून आला व त्याने ब्राह्मणाला त्याची इच्छा विचारली. तेव्हा ब्राह्मणने राजाला पूर्ण राज्य मागीतले. राजानेही ताबडतोब यासाठी होकार दिला व ब्राह्मणाला म्हणाला, मी तर अनेक दिवसांपासून याची प्रतिक्षा करत होतो की या ओझ्यातून केव्हा मुक्त होईल. आपण येथेच थांबा मी राज्याचा कारभार आपल्याकडे सोपवण्याची व्यवस्था करतो. असे म्हणून राजा महालात जातो. राजाचे म्हणणे ऐकून ब्राह्मण चिंतेत पडतो. त्याला वाटत नव्हते की, राजा एवढ्या सोप्या पद्धतीने राज्य सोपवून देईल. ब्राह्मणाच्या मनात ईश्वरीय भावना जागृत झाली आणि त्याने विचार केला की, वास्तविकतेमध्ये वैरागी तर राजा आहे. मी तर फक्त ढोंग करतो. हा तर मोहापासून दूर आहे. ब्राह्मणाला वास्तव्याची जाण झाली आणि तो तिथून निघून गेला. त्याला आपल्या मोहावर पश्चाताप झाला.

## हिवाळ्यात ओठांच्या आरोग्यासाठी



हायड्रेशन: भरपूर पाणी प्या, यामुळे ओठ कोरडे पडणार नाहीत.

नैसर्गिक उपाय: ग्लिसरीन आणि गुलाबजल: झोपण्यापूर्वी ग्लिसरीन आणि गुलाबजल एकत्र करून लावा, यामुळे ओठ मऊ होतात.

केशर आणि दही: सूर्यप्रकाशापासून बचाव करण्यासाठी केशर आणि दह्याचे मिश्रण लावा.

संरक्षण: लिप बाम: कोरड्या ओठांसाठी चांगल्या प्रतीचा लिप बाम वापरा.लिपस्टिक काळजी: लिपस्टिक लावण्यापूर्वी आणि नंतर ओठांची काळजी घ्या, जेणेकरून नुकसान होणार नाही.

काळजी: ओठांना सतत चाटू नका किंवा सोलून काढू नका, यामुळे जखमा होऊ शकतात. हिवाळ्यात विशेष काळजी घ्या, कारण हवामानातील बदलांमुळे ओठ कोरडे होतात.

## उपदेशकथा: दुष्टाला आश्रय



एका माणसाला एकदा सा-पाचं पिल्लू मिळालं. त्यानं ते घरी आणलं व तो त्याची देखभाल करू लागला. त्याला बांबूचं नळकांडं करून दिलं. त्यात गवत वगैरे घालून त्याच्या राहण्याची सोय करून दिली. त्याला खाण्यापिण्याची व्यवस्था करून दिली. एकदा एक साधू तिथं आला. त्यानं हे पहिलं व तो त्या माणसाला म्हणाला, "हे काय करतोस भलतंच तू ! भलत्यावर प्रेम करून त्याला आश्रय देणं धोक्याचं आहे. उद्या तुझ्यावर जीवित गमावण्याची वेळ येईल. तेव्हा वेळीच सावध हो आणि हा नाद सोडून दे.'' त्या माणसावर या उपदेशाचा काही परिणाम झाला नाही. एकदा काही कारणानं तो माणूस दोन दिवस बाहेरगावी गेला होता. तेथील सारी कामे आटोपून तो घरी परतला. आल्यावर त्यानं आपल्या लाडक्या सापाला हाक मारली. तो बाहेर येईना म्हणून त्याच्या घरात हात घातला. त्याबरोबर त्या सापानं दंश केला वत्या माणसाला प्राण गमवावे लागले.

**कथा उपदेश : दुष्टाला आश्रय देऊ नये.**

## सावकारी पाश

आपत्ती आल्यास शेतकर्यांसाठी विमा आहे; पण विम्याची रक्कम पाहिल्यास ती शेतकर्यांची थट्टा ठरते. शेतकर्याला आपले अवयव विकावे लागत असतील तर कृषी व्यवस्थेतील प्रगतीच्या बाता मारणे बंद व्हावे.

चंद्रपुरातील किडनी विक्री प्रकरण धक्कादायक आणि तेवढेच चक्रावून टाकणारे आहे. कर्ज फेडण्यासाठी किडनी विक्री, हे कुरूप वास्तव व्यवस्थेची लक्तरे वेशीवर मांडणारे ठरले. आर्थिक विकास झाल्याच्या गर्जना होतात; पण गावपातळीवर काय स्थिती आहे, हे पाहण्याची तसदी घेतली जात नाही. कायदे आहेत; पण सावकारी पाश अद्यापही कायम आहेत आणि त्या विळख्यात आर्थिकदृष्ट्या वंचित असलेल्यांचे जीवन गुदमरून गेले आहे. चंद्रपूर जिल्ह्यातील नागभीड तालुक्यात राहणार्या रोशन सदाशिव कुडे या शेतकर्याने सावकाराचे कर्ज फेडण्यासाठी आपली किडनी विकली. भारतात नव्हे, तर कंबोडियात! त्याचवेळी हे प्रकरण साधे नाही, हे पुरेसे सूचित झाले होते. मिंथुर हे कुडे यांचे गाव. चार एकर शेतीच्या आधारावर गुजराण. संसाराला हातभार लागावा म्हणून त्यांनी कर्ज घेऊन गायी विकत घेतल्या होत्या. गायी अचानक मरण पावल्यानंतर कुडे यांची परवड सुरू झाली. कर्ज एक लाख आणि कर्जावरील रोजचे व्याज दहा हजार रुपये ! पठाणी व्याजालाही लाजवेल अशी व्याज आकारणीची ही रचना. अर्थात, एक लाखाचे कर्ज पाहता पाहता तब्बल ७४ लाख रुपयांवर पोहोचले. सावकाराने कर्ज फेडण्यासाठी त्याला किडनी विकण्याचा प्रस्ताव दिला आणि तो मान्य करण्यावाचून त्याच्यासमोर पर्याय राहिला नाही. कोलकात्यात त्याची तपासणी झाली. कंबोडियात शस्त्रक्रिया होऊन किडनीचे त्याला आठ लाख रुपये मिळाले. पोलिसांकडे आपली कैफियत मांडण्याचा त्याने प्रयत्न केला; पण निगरगट्ट यंत्रणेने दाद दिली नाही. विधिमंडळाच्या नागपूर अधिवेशनात हा विषय आल्यावर खरे तर सर्व पक्षाच्या सदस्यांनी त्यावर आवाज उठविणे अपेक्षित होते. लोकप्रतिनिधींकडून ती अपेक्षा पूर्ण झाली नाही. एकच सकारात्मक बाब म्हणजे काँग्रेसचे नेते



विजय वडेट्टीवार यांच्या पाठपुराव्यामुळे सरकारला विशेष तपास पथक नेमावे लागले. या पथकाकडून सुरू झालेल्या चौकशीतून अनेक धक्कादायक बाबी उघड होत आहेत.

आधारहीन गरीब

किडनी विक्री प्रकरणातील मल्लेश नावाच्या दलाला अटक करण्यात आली आहे. डॉ. कृष्णा, या बनावट नावाने तो वावरत होता. आपण चेन्नईचे रहिवासी आहोत, असे त्याच्याकडून भासविले जात होते. तो प्रत्यक्षात डॉक्टर नाहीच! किडनी विक्रीच्या टोळीतील इतर आरोपींचा सहभाग त्याच्या चौकशीतून समोर येण्याची अपेक्षा आहे. कोलकाता आणि कंबोडिया, ही या प्रकरणातील दोन केंद्रे असल्याचे दिसते. राजस्तान, हरयाना, बिहार, उत्तर प्रदेश, पंजाब या राज्यातील काहींनी कंबोडियात आपली किडनी विकल्याची माहिती पुढे आली आहे. हे जाळे देशभर पसरले आहे यात शंका नाही. ते जेवढे भयानक, तेवढाच दोष शासन यंत्रणेकडे जातो. शेतकर्यांना नाडणार्या सावकारांची गय केली जाणार नाही, या केवळ नेत्यांकडून केल्या जाणार्या वल्गना ठरतात. शेतकर्यांच्या आत्महत्यांचे सत्र अखंड सुरू आहे. याला कारण ठरणार्या सावकारांवर कोणाचाच अंकुश नसावा, हे आणखी विदारक. रोशन कुडे यांची कहाणी जगजाहीर झाल्यावर नागभीडमध्ये काही सावकारांवर कारवाई करण्यात आली. कारवाई म्हणजे गुन्ह्याची नोंद. ते सिद्ध करण्याची इच्छाशक्ती यंत्रणांमध्ये उरली आहे का? हा खरा प्रश्न! आर्थिकदृष्ट्या महाराष्ट्र प्रगत आहे, असे राज्यकर्ते कोणत्या तोंडाने सांगतात? तसे असते तर शहरी महाराष्ट्र आणि ग्रामीण महाराष्ट्र यांच्यात विषमतेची दरी दिसली नसती. एखादा सावकार एक लाखावर दिवसाला दहा हजार रुपये व्याज घेतो, हे लपून राहू शकत नाही. याचा अर्थ उघड आहे. शेतकर्यांचे शोषण करणारे सावकार आणि अशा शोषणाला रोखण्याची अपेक्षा असलेली शासकीय यंत्रणा, यांच्यात संगनमत असल्याशिवाय दुष्टचक्र सुरू राहू शकत नाही. या वर्षभरात सप्टेंबर महिन्यापर्यंत राज्यातील ७८१ शेतकर्यांनी आपले जीवन संपवले आहे. आत्महत्येचा मार्ग स्वीकारणार्या शेतकर्यांची सर्वाधिक संख्या विदर्भात आहे. त्या खालोखाल मराठवाड्याचा क्रमांक लागतो. बँकांचे जाळे सर्वदूर पसरून उपयोग नसतो, त्यातून शेतकर्यांना आर्थिक आधार मिळावा लागतो. ते होत नसल्याने त्यांना सावकारांच्या दारात जावे लागते.

## पौष्टिक खा, फिट राहा! डॉक्टर टीप्स



नव्या वर्षात तुम्ही फिटनेसच्या दृष्टीनं काही संकल्प करत असाल तर त्याची सुरुवात आतापासून करणं गरजेचं आहे. सध्याचा काळात अत्याधुनिक जिम आणि उत्तम व अनुभवी व्यायाम प्रशिक्षक या सर्वांमुळे कठीण वाटणारा व्यायाम आता सोपा वाटू लागला आहे. तसंच काळाची गरज जाणून अनेकांती पावलं जिमच्या दिशेनं वळू लागली आहेत. तुमच्या संकल्पाच्या दृष्टीनं फायदेशीर ठरतील अशा व्यायामाच्या प्रकारांविषयी आजच्या लेखातून जाणून घेऊ या...

स्पिनिंग

या व्यायाम प्रकारात सायकल चालवण्यास प्राधान्य दिलं जातं. हे हृदय आणि फुफ्फुसासाठी फायदेशीर असतं. तुमच्या पायांच्या स्नायूंना देखील बळकटी मिळते. सायकलींमध्ये येणाऱ्या नवनव्या तंत्रज्ञानामुळे लोकांची सायकल चालवण्यात रुची वाढली आहे. सोबतच व्यायाम करण्यासाठी इतर पर्यायांसोबतच सायकलचा वापर देखील वाढत चालला आहे.

(**क्रमशः**)




## विनोद

राधा : काय गं राणी, तुझ्या नवऱ्याला तुरुंगात का जावे लागले?
राणी : काय नाही गं, यांनी नोटा छापायची सरकारशी स्पर्धा केली म्हणून.

## संदेश

Tourist = Ye kiska kankaal hai..?
Santa = Ye tipu-sultaan ka kankaal hai..
Tourist = Or ye bagal wala chhota sa kankaal kiska hai..?
Santa = Ye bhi tipu-sultaan ka kankaal hai.. jab wo chhota bachcha tha….

## सुविचार



शब्दांपेक्षा मौनच जास्त बोलके असते.
- कार्लाइल

**संस्कृत सुभाषित**

आयु: सत्त्वबलारोग्यसुखप्रीतिविवर्धना:।
रस्या: ास्निग्धा: ास्थिरा हृद्या आहारा: साात्विकप्रिया : ।।

अर्थ - जो आहार आयुष्य, मनोबल, शक्ती, प्रेम, सुख यांचे संवर्धन करतो, तोच आहार साात्विक लोकांना प्रिय असतो.(हा स्निग्ध आणि रसमय आहार असतो.)

## मनोरंजक महाशब्दकोडे



### आडवे शब्द

१. खर्चात कपात
६. पुष्कट
९. पोटापुरता शिधा
११. प्रमाणपत्र
१२. विश्रांती
१४. गणगोत
१६. तात्काळ
१८. आपला देश
१९. मोठी चूल
२०. चोरी करणारा
२२. झाडलोट
२४. वाढलेला व्याप
२५. जरतारीचा मोर यावर नाचतो
२७. प्रयत्न
२८. घाव, प्रहार
२९. रोखलेली नजर
३१. संतोष, आनंद
३४. समुद्रकिनारा
३८. पुरुष
३९. शिव! शिव!
४०. नुसतीच भटकंती
४१. विशेष
४२. अत्यंत यातनामय अवस्था
४५. माळ, सर
४६. हात
४८. पर्जन्य
४९. फोडातील द्रव
५०. गप्पांची जागा
५२. वक्र
५३. पूर्ण भेदून जाणारे
५४. शरीर
५५. अरण्य, जंगल
५६. तीव्र, अत्यंत टोकदार
५७. दिवस
५९. अर्धांगवायू
६१. चर्चा
६३. कावळा
६४. थोडेसुद्धा, अल्पप्रमाण
६५. टोळीचा प्रमुख
६७. खिडकी
६९. मच्छर
७१. तातडीचे संदेशवहन करण्याचा नामशेष झालेला प्रकार
७३. हनुमान (ग्रा.)
७५. प्रेम, ममता
७७. हमाल
८१. सूर्याचे एक नाव
८२. ठोक, हाण!
८३. युक्ती
८४. नेता, पुढारी

### उभे शब्द

१. कपडालत्ता
२. टिंगल, टवाळी
३. केव्हा (ग्रा.)
४. शाश्वत, चिरंतन
५. सोन्या-चांदीचा व्यापारी
७. महाशिवरात्रीचा मराठी महिना
८. परस्पर
९. पुन्हा पुन्हा
१०. प्रगती, उन्नत
१२. विमान
१३. कच्चे राहिल्यास निरूपयोगी मृत्तिकापात्र
१५. निवासस्थान
१७. आत-बाहेर करण्याची चौकट
२१. दात
२३. वंशपरंपरागत अधिकार
२६. फळातील द्रव
२७. सामान्य
३०. तापापूर्वीचे शहारे
३२. माणूसकी
३३. धैर्य, हिंमतीचे काम
३५. मगज
३६. कडक, न दबणारे
३७. साहित्यातील नऊ भावना
४१. मीठाची चव
४२. नाकी दम आणणारा आकडा
४३. भरपूर रस असलेला
४४. वेडावाकडा
४५. परिस्थिती
४६. पळसाचा डिंक
४७. जन्म-मृत्यू
४८. मोदकाचे आच्छादान
५०. पत्र
५१. अभिप्राय
५३. नाविकदल
५५. मध्यरात्रीचा पाऊस
५८. विरोध, द्वेष
६०. आठवाड्याचा दिवस
६२. चिकटून, जवळ
६६. अति तीव्र, जाळणारे
६८. माफी, दया
७०. दाताखालचा, मदतनीस
७२. महान
७४. कैकयीची दासी
७६. वेदना
७७. वजन
७८. सुंदर तरुणी, पत्नी
७९. शंकर
८०. शेवट

### आडवे उत्तरे

१.काटकसर ६.अमाप ९.पसाभार ११.परवाना १२.आराम १४.घरदार १६.तडकाफडकी १८.भारत १९.भट्टी २०.चोर २२.कोवारे २४.पसारा २५.पदर २७.सायास २८.वार २९.टक ३१.समाधान ३४.सागरतट ३८.नर ३९.हरहर ४०.वणवण ४१.खास ४२.नरकवास ४५.हार ४६.कर ४८.पाऊस ४९.लस ५०.टमटमनगरी ५२.वाकडा ५३.आरपार ५४.तन ५५.रान ५६.तीक्ष्ण ५७.वासर ५९.लकवा ६१.मसलत ६३.काक ६४.लवमात्र ६५.सरदार ६७.गवाक्ष ६९.डास ७१.तार ७३.हणमंत ७५.माया ७७.भारवाहक ८१.प्रभाकर ८२.मार ८३.करामत ८४.नायक

### उभे उत्तरे

१.कापडचोपड २.टर ३.कवा ४.सनातन ५.सराफ ७.माघ ८.परभारे ९.परतपरत १०.भरभराट १२.आकाशयान १३.मडके १५.दार १७.कीरवा २१.रद २३.वारसाहक्क २६.रस २७.साधारण ३०.कसकस ३२.मानवता ३३.साहस ३५.गर ३६.टणक ३७.नवरस ४१.खारट ४२.नऊ ४३.रस-वान ४४.वाकडातिकडा ४५.हालहवाल ४६.कमरकस ४७.जननमरण ४८.पारी ५०.टपाल ५१.मत ५३.आरमार ५५.रा-तवा ५८.सवतासुभा ६०.वार ६२.लगत ६६.दाहक ६८.क्षमा ७०.सहाय्यक ७२.थोर ७४.मंथरा ७६.यातना ७७.भार ७८.वामा ७९.हर ८०.अंत



# क्रीडा विश्व

## थोडक्यात/ संक्षिप्त

### देव विराट कोहलीला परत... सिद्धूच्या एका पोस्टने इंटरनेटवर खळबळ



मुंबई-भारतीय क्रिकेटचा दिग्गज फलंदाज विराट कोहली सध्या वनडे क्रिकेटमध्ये जबरदस्त फॉर्ममध्ये आहे. त्याच्या या शानदार कामगिरीने माजी क्रिकेटपटू नवजोत सिंग सिद्धूही भारावून गेले आहेत. नुकत्याच झालेल्या विजय हजारे ट्रॉफीमध्ये कोहलीची बॅट चांगलीच तळपली. अवघ्या दोन सामन्यात त्याने २०० हून अधिक धावा करत पुन्हा एकदा आपली गुणवत्ता सिद्ध केली. याच पार्श्वभूमीवर नवजोत सिंग सिद्धू यांनी सोशल मीडियावर एक भावनिक पोस्ट शेअर केली असून ती पाहता पाहता व्हायरल झाली आहे. या पोस्टने विराटचे चाहतेही भावुक झाले आहेत.

विराटसाठी सिद्धूंची भावनिक पोस्ट-नवजोत सिंग सिद्धू यांनी इन्स्टाग्रामवर विराट कोहलीच्या फलंदाजीचा एक व्हिडीओ शेअर करत त्याला मनाला भिडणारे कॅप्शन दिले आहे. सिद्धू यांनी लिहिले की, ''जर देवाने मला एक इच्छा मागण्याची संधी दिली, तर मी विराट कोहलीने कसोटी क्रिकेटमधील निवृत्ती मागे घ्यावी आणि पुन्हा रेड बॉल क्रिकेट खेळावे, अशी प्रार्थना करेन.'' त्यांच्या मते, असे झाले तर १.५ अब्ज भारतीयांना सर्वाधिक आनंद मिळेल. सिद्धूंनी कोहलीच्या फिटनेसचे कौतुक करत त्याला ''२४ कॅरेट सोनं'' असे संबोधले आणि त्याची तंदुरुस्ती आजही २० वर्षांच्या तरुणासारखी असल्याचे म्हटले.

### ऑस्ट्रेलियाला पराभवाने धक्का; झेळपीी ढरलश्रश मध्ये भारताची स्थिती बिकट! पुढले ६ महिने...

दिल्ली-क्रिकेट जगातील बहुचर्चित अॅशेसच्या २०२५-२६ च्या पर्वातील चौथा सामना २६ डिसेंबरपासून पुढील पाच दिवस खेळवला जाणार होता. मात्र ऑस्ट्रेलियाच्या सुमार कामगिरीमुळे अवघ्या दोन दिवसांमध्ये या सामन्याचा निकाल लागला आणि सामना २७ डिसेंबरला संपला. मेलबर्न क्रिकेट मैदानामध्ये हा सामना खेळवण्यात आला. या सामन्यात मिळालेला पराभव हा ऑस्ट्रेलियाला टेस्ट चॅम्पियनशीप २०२५-२७ च्या साकलमधील पहिला पराभव ठरला आहे.

२ दिवसाच्या सामन्यात काय घडलं?

ऑस्ट्रेलियन संघाने चौथ्या डावामध्ये इंग्लंडसमोर १७५ धावांचं लक्ष्य ठेवलं होतं. इंग्लंडने हा सामना ३२.२ ओव्हरमध्ये ६ गड्यांच्या मोबदल्यात सहज जिंकला. या रंजक सामन्यानंतर वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशीपच्या पॉइण्ट्स टेबलमध्ये मोठी उलथापालथ झाली आहे. चौथ्या कसोटीआधी इंग्लंडचा संघ २७.०८ पीटीसी म्हणजेच जिंकण्याच्या टक्केवारीनुसार पॉइण्ट्स टेबलमध्ये सातव्या स्थानी होता. मेलबर्नमधील विजयानंतर इंग्लंडच्या विजयी टक्केवारीत नक्कीच वाढ झाली असली तरी ते अजूनही सातव्या स्थानावर कायम आहेत.

पहिल्या दुसऱ्या स्थानी कोण?

दुसरीकडे ऑस्ट्रेलियन संघ बॉक्सिंग डे टेस्टच्या आधी १०० जिंकण्याच्या शक्यतेनुसार अव्वल स्थानी होता. मात्र आता ऑस्ट्रेलियाच्या पॉइण्ट्स टेबलमध्ये घसणर झाली आहे. दोन कसोटी सामने खेळणार आहे.

### १५ चेंडूत ठोकल्या ५० धावा; मोठ्या विक्रमाची बरोबरी

कॅन्टरबरी-न्यूझीलंडमध्ये सुरु असलेल्या महिला सुपर स्मॅश २०२५ मध्ये, कॅन्टरबरी महिला आणि ओटागो महिला यांच्यात स्पर्धेतील तिसरा सामना झाला, ज्यामध्ये ओटागोने ६ विकेट्सनं दणदणीत विजय मिळवला. या सामन्यात ओटागोकडून लॉरा हॅरिसने शानदार फलंदाजी केली आणि विरोधी गोलंदाज तिच्यासमोर अपयशी ठरले. सामन्यात कॅन्टरबरीने प्रथम फलंदाजी करत १४५ धावा केल्या, त्यानंतर ओटागोने हे लक्ष्य सहज गाठले.

लॉरा हॅरिसनं १५ चेंडूत ठोकले अर्धशतक : लॉरा हॅरिसने तिच्या डावाच्या सुरुवातीपासूनच तिची स्फोटक फलंदाजी सुरु ठेवली आणि विरोधी गोलंदाजांना उद्ध्वस्त केले. तिनं १७ चेंडूत एकूण ५२ धावा केल्या, ज्यात ६ चौकार आणि ४ षटकारांचा समावेश होता. उल्लेखनीय म्हणजे, लॉरानं फक्त १५ चेंडूत तिचं अर्धशतक पूर्ण केलं आणि महिला टी-२० क्रिकेटमध्ये संयुक्तपणे सर्वात जलद अर्धशतक झळकावणारी खेळाडू ठरली. तिच्या आधी मेरी केलीनं २०२२ मध्ये वॉरविकशायरकडून ग्लूस्टरशायरविरुद्ध १५ चेंडूत अर्धशतक झळकावलं होतं. आता लॉराने या विक्रमाची बरोबरी केली आहे.लॉरा हॅरिस फॉर्ममध्ये परतली : लॉरा हॅरिसने थइइङ मध्ये चांगली कामगिरी केली नव्हती. तिनं त्या हंगामात सिडनी थंडरसाठी एकूण १० सामने खेळले, त्यापैकी ८ मध्ये फलंदाजी केली आणि फक्त ६९ धावा केल्या.

आता ती फॉर्ममध्ये परतली आहे आणि खूप धावा करत आहे.

# ३० धावांनी टीम इंडियाचा विजयाचा चौकार!

## श्रीलंकेला नमवत मालिकेत ४-० ने भारतीय महिला संघाने घेतली आघाडी

**नवी दिल्ली:** भारत आणि श्रीलंका यांच्यात झालेल्या चौथ्या टी-२० सामन्यात भारतीय संघाने ३० धावांनी विजय मिळवला आहे.

भारत आणि श्रीलंका यांच्यात सुरू असलेल्या ५ टी -२० सामन्यांच्या मालिकेतील चौथा सामना तिरुवनंतपुरममध्ये पार पडला. या सामन्यात भारतीय संघाने धावांचा बचाव करताना ३० धावांनी विजय मिळवला आहे. भारतीय संघाने दक्षिण आफ्रिकेसमोर विजयासाठी २२२ धावांचे आव्हान ठेवले होते. या आव्हानाचा पाठलाग करताना श्रीलंकेने दमदार सुरुवात केली. पण शेवटी भारतीय गोलंदाजांनी दमदार पुनरागमन केलं आणि भारतीय संघाला विजय मिळवून दिला. यासह भारतीय संघाने विजयाचा चौकार मारत मालिकेत ४-० ने आघाडी घेतली आहे.

भारतीय संघाने उभारला २२१ धावांचा डोंगर

या सामन्यात श्रीलंकेने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. प्रथम फलंदाजी करण्यासाठी आलेल्या भारतीय संघाने २० षटकांअखेर २२१ धावांचा डोंगर उभारला. भारतीय संघाकडून स्मृती मानधना आणि शफाली वर्माने १६२ धावांची विक्रमी भागीदारी केली. शफाली वर्माने ७९ धावा केल्या. तर स्मृती मानधनाने ८० धावांची खेळी केली. ही जोडी फुटल्यानंतर ऋचा घोषने नाबाद ४० धावांची खेळी केली. तर कर्णधार हरमनप्रीत कौरने नाबाद १६ धावा केल्या. यासह भारतीय संघाने २ गडी बाद २२१ धावांपर्यंत मजल मारली.

या धावांचा पाठलाग करण्यासाठी आलेल्या श्रीलंकेकडून हसिनी परेराने ३३ धावांची खेळी केली. तर चमिरा अटापटूने सर्वाधिक ५२ धावांची खेळी केली. हर्शिथा समरविक्रमाने २० धावांची खेळी केली. तर कविशा दिलहारीने १३ धावांची खेळी केली. निलक्षी डी सिल्वा २३ धावांवर नाबाद राहिली तर कौशिनीने ५ धावांची



खेळी केली. श्रीलंकेला ६ गडी बाद १९१ धावांपर्यंत मजल मारता आली. पण श्रीलंकेचा संघ विजयापासून ३० धावा दूर राहिला.

या सामन्यात भारतीय संघाची सलामीवीर फलंदाज स्मृती मानधनाने मोठ्या विक्रमाला गवसणी घातली आहे. स्मृती मानधनाने आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये १० हजार धावा पूर्ण केल्या आहेत. ती आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये सर्वात जलद १० हजार धावांचा पल्ला गाठणारी फलंदाज ठरली आहे. याआधी मिताली राजने १० हजार धावांचा पल्ला गाठला होता. स्मृती मानधना ही आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये १० हजार धावांचा पल्ला गाठणारी चौथी फलंदाज ठरली आहे. भारतीय संघाने उभारला २२१ धावांचा डोंगर

या सामन्यात श्रीलंकेने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. प्रथम फलंदाजी करण्यासाठी आलेल्या भारतीय संघाने २० षटकांअखेर २२१ धावांचा डोंगर उभारला. भारतीय संघाकडून स्मृती मानधना आणि शफाली वर्माने १६२ धावांची विक्रमी भागीदारी केली. शफाली वर्माने ७९ धावा केल्या. तर स्मृती मानधनाने ८० धावांची खेळी केली. ही जोडी फुटल्यानंतर ऋचा घोषने नाबाद ४० धावांची खेळी केली. तर कर्णधार हरमनप्रीत कौरने नाबाद १६ धावा केल्या. यासह भारतीय संघाने २ गडी बाद २२१ धावांपर्यंत मजल मारली. या धावांचा पाठलाग करण्यासाठी आलेल्या श्रीलंकेकडून हसिनी परेराने ३३ धावांची खेळी केली. तर चमिरा अटापटूने सर्वाधिक ५२ धावांची खेळी केली. हर्शिथा समरविक्रमाने २० धावांची खेळी केली. तर कविशा दिलहारीने १३ धावांची खेळी केली. निलक्षी डी सिल्वा २३ धावांवर नाबाद राहिली तर कौशिनीने ५ धावांची खेळी केली. श्रीलंकेला ६ गडी बाद १९१ धावांपर्यंत मजल मारता आली. पण श्रीलंकेचा संघ विजयापासून ३० धावा दूर राहिला.

## स्मृतीचा धमाका... सांगलीच्या पोरीने इतिहास घडवला, वर्ल्ड क्रिकेटमध्ये झाला नवा विक्रम!

थिरुवनंतपुरम-श्रीलंकेविरुद्धच्या चौथ्या टी-२० आंतरराष्ट्रीय सामन्यात स्मृती मानधनाने धमाका केला आहे. स्मृतीने ४८ बॉलमध्ये १६६.६७ च्या स्ट्राईक रेटने ८० रन केले आहेत, ज्यात ११ फोर आणि ३ सिक्सचा समावेश होता. स्मृतीसोबतच शफाली वर्माने ४६ बॉलमध्ये १७१.७४ चा स्ट्राईक रेट आणि १२ फोर, १ सिक्सच्या मदतीने ७९ रन केले. तर रिचा घोषने १६ बॉलमध्ये नाबाद ४० आणि कर्णधार हरमनप्रीत कौरने १० बॉलमध्ये नाबाद १६ रन केले. स्मृती आणि शफालीच्या धमाक्यामुळे पहिले बॅटिंग करणाऱ्या टीम इंडियाने २० ओव्हरमध्ये २ विकेट गमावून २२१ रन केले. श्रीलंकेविरुद्धच्या या सामन्यात स्मृती मानधनाने आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये १० हजार रन पूर्ण केल्या. मॅचमध्ये २७ वी रन घेताच स्मृतीने १० हजार रनचा आकडा पार केला आणि मिताली राजचा महारेकॉर्डही तिने उद्ध्वस्त केलं. स्मृती ही महिला क्रिकेटमध्ये सगळ्यात जलद १० हजार रन करण्याचा विक्रम केला आहे. याआधी हे रेकॉर्ड मिताली राजच्या नावावर होतं. मितालीला १० हजार रन पूर्ण करण्यासाठी ३१४ इनिंग लागल्या होत्या. पण स्मृतीने १० हजार रन पूर्ण करण्यासाठी मितालीपेक्षा ३४ इनिंग कमी खेळल्या.

मिताली आणि स्मृतीशिवाय चार्लोट एडवर्ड्सने ३१६ इनिंगमध्ये आणि सुजी बेट्सने ३४३ इनिंगमध्ये १० हजार आंतरराष्ट्रीय रन केले होते. स्मृती आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये १० हजार रन करणारी फक्त चौथी महिला आहे. मिताली राज महिला आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये सर्वाधिक रन करणारी महिला आहे, तिने १०,८६८ रन केले आहेत.महिला आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये सर्वाधिक रन

मिताली राज – १०८६८ रन

सुजी बेट्स – १०६५२ रन

शार्लेट एडवर्ड्स- १०२७३ रन

स्मृति मंधाना – १०००० रनङ

नॅट साइवर-ब्रंट – ८१९७ रन

हरमनप्रीत कौर – ८०८८ रन

मेग लॅनिंग – ८००७ रन

## चहलनंतर आता या क्रिकेटरचेही लग्न तुटले, ६ वर्षांनी पत्नीला दिला घटस्फोट





दिल्ली-पाकिस्तान क्रिकेट संघाचा माजी ऑल राउंडर इमाद वसीमने लग्नाच्या ६ वर्षांनी घटस्फोट घेतला आहे. इमाद वसीमने ऑगस्ट २०१९ मध्ये सानिया अशफाक सोबत विवाह केला होता. याचवर्षी इमाद वसीमवर अफेअरचे आरोप सुद्धा लागले होते. इमाद आणि असफाक यांची दोन मुलं सुद्धा आहेत. इमाद वसीमने इंस्टाग्रामवर एक स्टोरी शेअर करून त्याचा घटस्फोट झाल्याची माहिती दिली. इमादने त्याच्या इंस्टाग्राम स्टोरीवर लिहिले की, 'खूप विचारविनिमय केल्यानंतर आणि गेल्या काही वर्षांपासून वारंवार होणारे वाद जे सोडवले गेले नाहीत, त्यामुळे मी घटस्फोटासाठी अर्ज दाखल केला आहे'. इमाद वसीमने पुढे लिहिलं की, 'मी सर्वांना मनापासून विनंती करतो की त्यांनी आमच्या गोपनीयतेचा आदर करावा आणि जुने कपल फोटो वापरणे किंवा शेअर करणे टाळावे. कृपया भविष्यात तिला माझी पत्नी म्हणून संबोधू नका. मी सर्वांना विनंती करतो की कोणत्याही दिशाभूल करणाऱ्या माहितीला बळी पडू नका किंवा त्यावर विश्वास ठेवू नका. या वैयक्तिक प्रकरणात कोणाचीही बदनामी करण्याचा किंवा इतरांना ओढण्याचा कोणताही प्रयत्न झाल्यास आवश्यक असल्यास योग्य कायदेशीर मार्गांनी कारवाई केली जाईल. मुलांबद्दल सांगायचे तर, मी त्यांचा पिताच राहीन आणि त्यांची पूर्ण जबाबदारीने काळजी घेत राहीन'.कोण आहे इमादची पूर्व पत्नी सानिया असफाक : इमाद वसीमची पूर्व पत्नी सानिया अशफाक ही मूळची ब्रिटिश वंशाची पाकिस्तानी आहे. सानिया आणि इमादची पहिली भेट लंडनमध्ये झाली होती.

## सामना सुरू होण्याआधीच काळजावर घाव!

दिल्ली-बांगलादेशमधून क्रिकेट विश्वाला हादरवणारी आणि मन हेलावून टाकणारी बातमी समोर आली आहे. २७ डिसेंबर रोजी बांगलादेश प्रीमियर लीग च्या नव्या हंगामाची सुरुवात होणार होती. सिल्हट आंतरराष्ट्रीय क्रिकेट स्टेडियमवर ढाका कॅपिटल्स आणि राजशाही रॉयल्स यांच्यात पहिला सामना खेळवला जाणार होता. मात्र सामना सुरू होण्याआधीच ढाका कॅपिटल्सचे सहाय्यक प्रशिक्षक महबूब अली जकी यांना अचानक हृदयविकाराचा तीव्र झटका आला आणि त्यांचे निधन झाले.

सामना सुरू होण्यापूर्वीच हृदयविकाराचा झटका

ढाका कॅपिटल्स आणि राजशाही रॉयल्सचे खेळाडू सामना सुरू होण्यापूर्वी वॉर्म-अप करत होते. त्याच वेळी महबूब अली जकी यांची प्रकृती अचानक बिघडली आणि ते मैदानावरच कोसळले. संघाच्या वैद्यकीय पथकाने तात्काळ उपचार सुरू करत त्यांना ण्र्झीं देण्याचा प्रयत्न केला. मात्र त्याचा काहीही परिणाम झाला नाही. मैदानावर उभ्या असलेल्या रुग्णवाहिकेतून त्यांना तातडीने रुग्णालयात नेण्यात आले, जिथे डॉक्टरांनी तपासणी करून त्यांना मृत घोषित केले. सहाय्यक प्रशिक्षक मैदानावर कोसळताना दोन्ही संघांचे खेळाडू आणि कोचिंग स्टाफ तेथेच उपस्थित होते. हा प्रसंग पाहून सर्वजण सुन्न झाले. काही काळ तणावपूर्ण वातावरण निर्माण झाले आणि मैदानावर एकच गोंधळ उडाला. ढाका कॅपिटल्सने अधिकृत निवेदनात सांगितले की, प्रशिक्षणादरम्यान महबूब अली जकी यांना अस्वस्थ वाटू लागले होते. ते अचानक मैदानावरच कोसळले. रुग्णालयात नेण्यापूर्वी मैदानावरच ण्र्झीं देण्यात आले, मात्र त्यांना वाचवता आले नाही.

### मैदानावर कोचचा मृत्यू, क्रिकेटविश्व स्तब्ध, नेमके काय घडले?

**बांगलादेश क्रिकेट बोर्डाकडून शोक व्यक्त**

महबूब अली जकी यांच्या दुर्दैवी निधनावर बांगलादेश क्रिकेट बोर्डानेही तीव्र शोक व्यक्त केला आहे. बोर्डाने आपल्या निवेदनात म्हटले आहे, ''बांगलादेश क्रिकेट बोर्डाचे वेगवान गोलंदाजी प्रशिक्षक आणि ढाका कॅपिटल्सचे सहाय्यक प्रशिक्षक यांच्या निधनाने आम्हाला प्रचंड दु:ख झाले आहे. आज दुपारी १ वाजता त्यांचे निधन झाले. वेगवान गोलंदाजीसाठी दिलेले त्यांचे योगदान कधीही विसरले जाणार नाही. त्यांना नेहमीच मोठ्या सन्मानाने आठवले जाईल. या कठीण प्रसंगी बांग्लादेश क्रिकेट बोर्ड त्यांच्या कुटुंबासोबत खंबीरपणे उभा आहे.''

## नोरा फतेहीचा बॉयफ्रेंड कोण? आहे कोट्यावधींची संपत्ती

### त्या प्रसिद्ध फुटबॉल खेळाडूसोबत लग्न करणार?



मुंबई-मदिलबरफ, मसाकी-साकीफ आणि मकुसू - कुसूफ सारख्या गाण्यांनी लोकप्रियता मिळवलेली नोरा फतेहीने बॉलिवूडमध्ये स्वत:चे स्थान पक्के केले आहे. तिने आतंरराष्ट्रीय स्तरावरही आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे. तिचे बरेच गाणे सुपरहिट झाले आहे. नोरानं अनेक चित्रपटातून आपल्या अभिनयाची छाप सोडली आहे. दरम्यान, नोरा एका वेगळ्याच कारणासाठी प्रकाशझोतात आली आहे. आणि ते कारण म्हणजे तिचं वैयक्तिक आयुष्य. मीडिया रिपोर्ट्सनुसार, अभिनेत्रीला तिचा जीवनसाथी सापडला आहे. पण ती व्यक्ती नेमकी कोण आहे? नोरा लवकरच विवाहबंधनात अडकणार का? तिला आपला जीवनसाथी सापडला आहे का? असे अनेक प्रश्न उपस्थित केले जात आहे? दरम्यान, नोराचा मसपनों का राजकुमारफ नक्की कोण? असा प्रश्न चाहतेवर्गाकडून उपस्थित केला जात आहे.



नोरा फतेही तिच्या वैयक्तिक आयुष्याबरोबच तिच्या व्यावसायिक आयुष्यामुळेही चर्चेत असते. नोरा आता तिच्या लव्ह लाईफमुळे चर्चेत आली आहे. २०२२ या काळात नोराने फिफा वर्ल्ड कपमध्ये परफॉर्म केला होता. मलाइट द स्कायफ हे गाणे तिने गायले होते. त्यामुळे, फुटबॉलशी तिचे जुने नाते असले तरी, आता तिचे हृदय एका फुटबॉलपटूसाठी धडधडत आहे. पिंकव्हिलाच्या वृत्तानुसार, नोरा एका करोडपती फुटबॉलपटूला डेट करत आहे. ती खास २०२५ च्या आफ्रिकन कप ऑफ नेशन्स फुटबॉस सामने पाहण्यासाठी मोरक्कोला गेली आहे. मीडिया रिपोर्ट्सनुसार, दुबई आणि मोरोक्कोमध्ये दोघांना बऱ्याचदा स्पॉट करण्यात आले आहे. पण दोघांनी सध्या ही बाब प्रायव्हेट ठेवण्यास प्राधान्य दिले आहे. कारण नोरा सध्या कामावर लक्ष केंद्रीत आहे. याच कारणामुळे तिने वैयक्तिक आयुष्य गुपित ठेवणे आहे. मीडिया रिपोर्ट्सनुसार, नोरा सध्या एका प्रसिद्ध फुटबॉसपटूला डेट करत असल्याचा दावा करण्यात आला आहे. परंतु, त्या व्यक्तीची ओळख अद्याप पूर्णपणे अस्पष्ट आहे. नोराचे कोणाशीही नाव जोडण्याची ही पहिलीच वेळ नाही. यापूर्वी तिचे नाव प्रिन्स नरूला, अंगद बेदी आणि टेरेन्स लुईस यांच्याशी जोडले गेले होते. तसेच अमेरिकन गीतकार बेन्सन बूनसोबतही तिचे नाव जोडले गेले होते. दरम्यान, तिचे सध्या नाव करोडपती फुटबॉलपटूसोबत जोडले जात आहे. नोराचे रिलेशनशिप सुरू आहे का? ती लवकरच लग्नबंधनात अडकणार का? असे अनेक प्रश्न नेटकऱ्यांकडून उपस्थित केला जात आहे.

# तथागत बुद्धांचा विचार मानवतेचा विचार- भिक्खु करुणानंद महाथेरो (दिल्ली)

**लातूर/प्रतिनिधी :** तथागत बुद्धाने सर्व मानव जाती करीता आपल्या नितिमान धम्माची शिकवण दिली आहे. सर्व जीव प्राण्यांचे कल्याण व्हावे यासाठी करुणा, मैत्री आणि अहिंसा या उच्च तत्वाचा उपदेश केला आहे. भवतु सब्ब मंगल आणि बहुजन हिताय सुखाय हा विश्व कल्यानाचा मार्ग बुद्धाने सर्वप्रथम सांगितलेला आहे त्यामुळे तथागत बुध्दाचा विचार हा मानवतेच्या हिताचा विचार असल्याचे प्रतिपादन अ. भा. भिक्खु संघांचे संघनायक पू. भिक्खु करुणानंद महाथेरो (दिल्ली) यांनी केले आहे.

बौध्द धम्म संस्कार प्रशिक्षण चॅरिटेबल ट्रस्ट व समस्त बौध्द उपासक-उपासिकांच्यावतीने डॉ. भिक्खु उपगुप्त महाथेरो यांच्या मार्गदर्शनाखाली व भिक्खु पय्यानंद थेरो यांच्या संयोजनाद्वारे महाविहार, धम्म संस्कार केंद्र, बार्शी रोड, सातकर्णी नगर, रामेगाव ता. जि. लातूर येथे एक दिवशीय आठवी अ. भा. बौद्ध धम्म परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. धम्म परिषदेच्या सकाळच्या पहिल्या सत्रात आंबेडकर चौक आणि बौध्द नगर येथून पंचरंगी ध्वजारोहण करून महापुरुषांच्या मुर्तीसह भिक्खु संघ आणि बौध्द उपासक-उपासिका यांची भव्य धम्म मिरवणूक काढण्यात आली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर पार्क, लातूर येथे मिरवणुकीचे समापन झाले.







डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या स्मारकास सर्व कार्यकर्ते यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आले. भिक्खु पय्याबोधी थेरो यांच्या हस्ते ध्वजारोहन करून त्रिशरण पंचशिल वंदना घेण्यात आली.

धम्म परिषदेच्या दुपारच्या दुसऱ्या उदघाट्कीय सत्रात अ. भा. भिक्खु संघांचे संघनायक भिक्खु करुणानंद महाथेरो (दिल्ली) यांच्या हस्ते पूज्य भिक्खु संघ, प्रमुख अतिथी यांच्या उपस्थितीत उद्घाटन करण्यात आले. यावेळी हजारोच्या संख्येने बौध्द जनसमुदाय उपस्थित होता. प्रारंभी सामूहिक बुद्ध वदंना करून भिक्खु संघांचे व मान्यवरांचे स्वागत केले गेले. यावेळी सातकर्णी स्मरणिके सहीत आर्या मेत्ता, डॉ. मा. ना. गायकवाड यांच्याही ग्रंथाचे प्रकाशन सर्वांच्या हस्ते करण्यात आले.

आठव्या बौध्द धम्म परिषदेस विशेष अतिथी म्हणून प्रख्यात सिने अभिनेते गगन मलिक, माजी मंत्री आ. अमित देशमुख, माजी मंत्री आ. संजय बनसोडे यांची उपस्थिती होती.

यावेळी बोलताना गगन मलिक म्हणाले की, बौध्द समूहाने धम्माचे तंतोतंत पालन करून भारतात बौध्द धम्म प्रसारित करण्यासाठी बौध्द अनुयायांनी उत्साहात काम करणे आवश्यक आहे.

यावेळी बोलताना माजी मंत्री आ. संजय बनसोडे म्हणाले की, बौध्द धम्म संस्कार प्रशिक्षण चॅरिटेबल संस्था ही लातूर जिल्ह्यात बौध्द धम्माचे प्रभावी काम करत असल्याचे नमूद करीत महाविहार धम्म संस्कार केंद्रास येणाऱ्या काळात तीर्थक्षेत्र विकासाचा ब दर्जा प्राप्त करून व विकास निधी मिळवून देण्याचे आश्वासनत्यांनी दिले.

यावेळी बोलताना माजी मंत्री आ. अमित देशमुख म्हणाले की, बौध्द धम्म हा भारताचा मुळ धर्म आहे. गौतम बुध्दामुळे भारताची जगात विशेष ओळख आहे. पानगाव येथील चैत्य स्मारक व महाविहार सातकर्णी नगर हे दोन्ही श्रद्धास्थाने लातूर जिल्ह्यातील प्रमुख केंद्रे आहेत. महाविहार सातकर्णी नगर धम्म केंद्र हे येणाऱ्या काळात बौध्द धम्माची बुध्दसृष्टी साकारण्यासाठी स्वतः कठीबद्द असल्याचे अभिवचन त्यांनी दिले.

यावेळी श्रीलंकेचे माजी खासदार भिक्खु अतुरलीये रतन महाथेरो यांच्या सह, डॉ. खेमधम्मो महाथेरो, प्राचार्य सत्यपाल महाथेरो, डॉ. इंदवंस महाथेरो, भिक्खु करुणानंद महाथेरो, भिक्खु नागसेन, भिक्खु पय्याबोधी थेरो, भिक्खु धम्मबोधी थेरो, भिक्खु सुमेध नागसेन इत्यादी भिक्खुंची धम्मदेशना रात्री उशिरा पर्यंत झाली.

यावेळी भिक्खु धम्मानंद महाथेरो, शिलरत्न थेरो, सुभूती थेरो, नागसेनबोधी थेरो, भंते बोधीराज, भंते पय्यावंस इत्यादी मोठ्या संख्येने भिक्खु संघ उपस्थित होते.

धम्मदेशने नंतर प्रसिद्ध गायक विकास राजा (नागपूर) यांचा बुध्द-भीम गीतांचा प्रबोधनात्मक आणि सांस्कृतिक कार्यक्रम संपन्न झाला.

या परिषदेस आनंद (दिल्ली), लातूर ग्रामीणचे उपविभागीय पोलीस अधिकारी साहेबराव नरवाडे, डॉ. सुधाकर गुळवे, बसवंत उबाळे, प्राचार्य डॉ. सुरेश वाघमारे, संजय सावंत, एम.एन. गायकवाड, आनंद नरंगलकर, मल्लिकार्जुन करडखेलकर, रघुनाथ बनसोडे प्रा. यु. डी. गायकवाड, भिमराव चौदंते, डॉ. संजय गवई, बाबा कांबळे, सुशील चिकटे, विनोद खटके, आतिश चिकटे, कैलाश कांबळे, प्रा. प्रवीण कांबळे, डॉ. विजय अजनीकर, जि. एस. साबळे, पाडुरंग अंबुलगेकर, आर. एस. सोनकांबळे कांबळे, डॉ. दुष्यंत कटारे, प्रविण सूर्यवंशी, सचिन गायकवाड, कॅप्टन माधव कांबळे, सुधाकर कांबळे, विठ्ठल जाधव, संजय ओहळ, अन्तेश्वर थोटे, डॉ. अरुण कांबळे, सतिश कांबळे, विशाल वाहुळे, निलेश बनसोडे, आशा चिकटे, शोभा सोनकांबळे, सुजाता अजनीकर, विद्या ससाणे, कांचन अजनीकर, पंचशिला बनसोडे, शशिकला सुरवसे, कल्पना कांबळे, रेखा सुरवसे, निर्मला थोटे, शकुंतला नेत्रगांवकर, कविता कदम, सुनीता गायकवाड, निर्मला मधाळे, सरिता बनसोडे, भाग्यश्री सावंत आणि ममता गवई यांच्या सह हजारोंच्या संख्येने बौध्द उपासक उपासिका उपस्थित होते.

धम्मपरिषदेचे प्रास्ताविक केशव कांबळे यांनी केले आणि सूत्रसंचालन प्रा. देवदत्त सावंत यांनी केले.

परिषदेच्या यशस्वीतेसाठी उदय सोनवने, विलास आवशंक, ज्योतीराम लामतुरे, अनिरुध्द बनसोडे, राजेश कदम, सतिश मस्के, करण ओव्हाळ, गौतम आदमाने, यशपाल मस्के, कुमार सोनकांबळे, समाधान मस्के, अविनाश आदमाने, मिलिंद धावारे यांच्यासह धम्मसेवक ग्रुपच्या सर्व सदस्यांनी अथक परिश्रम घेतले.

# भादा येथील जि.प कन्या शाळेच्या नवीन इमारतीसाठी आ.रमेशआप्पा कराड यांच्या प्रयत्नातून ९० लाखाचा निधी

**लातूर/प्रतिनिधी :** लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघातील मौजे भादा येथील जिल्हा परिषद कन्या शाळेच्या दुमजली नवीन वर्ग खोल्या बांधकामासह इतर तीन ठिकाणच्या जिप शाळेच्या विविध विकास कामासाठी भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांच्या प्रयत्नातून १ कोटी २५ लक्ष ३५ हजार रुपयांचा निधी जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागामार्फत २३ डिसेंबर २०२५ रोजीच्या आदेशान्वये मंजूर झाला आहे. सदरील निधी मंजूर झाल्याने भादा येथील कन्या शाळेचे रूपडे बदलणार आहे.

लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघातील अनेक गावातील जिल्हा परिषद शाळेची दुरावस्था झाल्याने त्या ठिकाणी नव्याने वर्ग खोल्या बांधण्यात याव्यात त्याचबरोबर शाळेच्या परिसरात विकास कामे करण्यात यावीत याकरिता भाजप नेते आ. रमेशआप्पा कराड यांनी जिल्ह्याचे पालकमंत्री ना. शिवेंद्रसिंहराजे भोसले यांच्याकडे वेळोवेळी पाठपुरावा केला होता.

## अंकोली, धानोरी आणि भोकरंबा येथील शाळेच्या विविध विकास कामासाठी निधी मंजूर

आ. रमेशआप्पा कराड यांनी केलेल्या पाठपुराव्यामुळे लातूर ग्रामीण मतदार संघात असलेल्या औसा तालुक्यातील मौजे भादा येथील जिल्हा परिषद कन्या प्रशाला या शाळेच्या जुन्या वर्ग खोल्या पाडून त्याच जागेवर दोन मजली नवीन वर्ग खोल्या बांधणे, ग्रंथालय, प्रयोगशाळा, स्वच्छतागृह, विद्युतीकरण, यासह इतर नव्याने बांधकाम करण्यात यावे यासाठी ९० लक्ष रुपयाचा निधी मंजूर झाला आहे. त्याचबरोबर लातूर तालुक्यातील मौजे जिल्हा परिषद प्रशाला अंकोली येथे नवीन दोन वर्ग खुल्या विद्युतीकरणासह काम करणे २१ लक्ष ८५ हजार, जिल्हा परिषद प्रशाला धानोरी येथे मुलींसाठी स्वच्छतागृह बांधकाम करणे ४ लक्ष ५० हजार आणि रेणापूर तालुक्यातील मौजे भोकरंबा येथील जिल्हा परिषद प्रशाला या शाळेची संरक्षण भिंत बांधकाम करण्यासाठी ९ लक्ष असा एकूण १ कोटी २५ लक्ष ३५ हजार रुपये रुपयाचा निधी मंजूर झाला आहे.



भादा येथील शाळेचे बांधकाम व्हावे अशी मागणी अनेक दिवसापासून पालकाबरोबरच शालेय विद्यार्थ्यांची होती सदर शाळेच्या नवीन इमारतीसाठी लातूर जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागात मार्फत निधी मंजूर झाल्याने या शाळेची दुरावस्था नाहीशी होऊन अत्यंत देखणी इमारत उभी राहणार आहे.

जिल्हा परिषद शाळेत गोरगरीब, कष्टकरी, सर्वसामान्य कुटुंबातील मुले शिक्षण घेतात या विद्यार्थ्यांना चांगली इमारत आणि इतर शैक्षणिक सोई सुविधा मिळाव्यात यासाठी भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांचा सातत्याने प्रयत्न राहिला आहे. भादा येथील जिल्हा परिषद कन्या शाळेच्या नवीन इमारती बांधकामासह इतर शाळेच्या कामासाठी १ कोटी २५ लक्ष रुपयाचा निधी मिळवून दिल्याबद्दल भादा ग्रामस्थासह त्या त्या गावातील भाजपाचे लोकप्रतिनिधी, पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांसह पालकांनी आ. रमेशआप्पा कराड यांचे आभार व्यक्त केले आहेत.

# दयानंद विज्ञान महाविद्यालयातील प्रा.डॉ.केदार व प्रा.डॉ. इबाते यांना युनायटेड किंगडमचे आंतरराष्ट्रीय पेटंट मंजूर

## रासायनिक क्रिया नियंत्रित करून कमी कालावधीत संशोधन करण्यासाठी त्यांनी केली नवीन उपकरणाची संशोधकांसाठी निर्मिती

**लातूर/प्रतिनिधी :** येथील दयानंद विज्ञान महाविद्यालयातील रसायनशास्त्र विभागातील प्रा.डॉ. नाथराव केदार व प्रा.डॉ.श्याम इबाते यांना युनायटेड किंगडम् या देशाचे आंतरराष्ट्रीय दर्जाचे डिझाईन पेटंट त्यांच्या संशोधनासाठी मिळालेले आहे.त्यांनी रासायनिक प्रक्रिया करण्यासाठी रासायनिक क्रिया नियंत्रित करण्यासाठी नवीन साधन तयार केले असून या साधनाच्या माध्यमातून रासायनिक क्रियेला लागणारा वेळ हा नियंत्रित करून कमी वेळेत अचूक माहिती या साधनाद्वारे प्राप्त होते,यासंबंधीचे संशोधन केल्यामुळे संशोधकांचा लागणारा वेळ कमी होऊन त्यांना त्यांची मदत होऊ शकते.या संशोधनाची दखल घेऊन युनायटेड किंगडम् या देशाने डिझाईन नावाचे पेटंट दिलेले आहे.





या पेटेंटचे महत्त्व सांगताना डॉ.नाथराव केदार यांनी असे म्हटले आहे की,एखादी रासायनिक प्रक्रिया महिनोंमहिने तासनतास चालत असल्यामुळे संशोधन कार्य करत असताना संशोधकांना या सर्व गोष्टींसाठी खूप वेळ द्यावा लागत असे.त्यामुळे त्यांना हे काम करत असताना रात्रंदिवस काम पाहावे लागत असे.परंतु या नवीन संशोधनामुळे संशोधकाचा वेळ कमी झालेला आहे.याचा फायदा नवीन संशोधकांना होणार आहे.

या नावीन्यपूर्ण संशोधनाबद्दल दयानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष लक्ष्मीरमण लाहोटी,उपाध्यक्ष अरविंदराव सोनवणे,ललितभाई शाह, रमेशकुमार राठी,सचिव रमेश बियाणी,कोषाध्यक्ष संजय बोरा, संयुक्त सचिव विशाल लाहोटी, सहाय्यक सचिव अॅड.श्रीकांत उटगे,अजिंक्य सोनवणे, महाविद्यालयाचे प्र.प्राचार्य डॉ.सिद्धेश्वर बेल्लाळे यांच्यासह सर्व विभाग प्रमुख,प्राध्यापक, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी त्यांचे अभिनंदन व कौतुक केले आहे.

# दयानंद वाणिज्य महाविद्यालयात करिअर कट्टामार्फत ‘२२ मिनिटांचा एडब्ल्यूएस करिअर दौरा’ उपक्रम संपन्न







**लातूर/प्रतिनिधी :** महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने राबविण्यात येणारा करिअर कट्टा हा उपक्रम विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी सातत्याने शैक्षणिक, तांत्रिक व करिअरविषयक मार्गदर्शन करत आहे. या उपक्रमांतर्गत दि. २२ डिसेंबर २०२५ रोजी राष्ट्रीय गणित दिनानिमित्त दयानंद वाणिज्य महाविद्यालयात विद्यार्थ्यांसाठी ‘२२ मिनिटांचा एडब्ल्यूएस करिअर दौरा’ हा विशेष प्रशिक्षण उपक्रम आयोजित करण्यात आला.

या उपक्रमामध्ये संगणक क्षेत्रातील करिअर संधी, माहिती साठवण व्यवस्था, सर्व्हर, क्लाउड संगणन प्रणाली, फायबर ऑप्टिक तंत्रज्ञान, एडब्ल्यूएस (अॅमेझॉन क्लाउड सर्व्हर), आयपी पत्ता आदी विषयांवर सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. तसेच उपक्रमानंतर विद्यार्थ्यांना उत्तर-मूल्यमापनाच्या माध्यमातून एडब्ल्यूएस प्रमाणपत्र मिळविण्याची संधी उपलब्ध करून देण्यात आली.

सदर उपक्रमाचा शुभारंभ दि. २२ डिसेंबर २०२५ रोजी सकाळी ठीक १०.२२ वाजता झाला. यामध्ये दयानंद वाणिज्य महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. प्राचार्य डॉ. प्रशांत मान्नीकर यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम यशस्वीरीत्या पार पडला. कार्यक्रमास महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. गणेश लहाने, आयक्यूएसी समन्वयक डॉ. बाळासाहेब चव्हाण, ग्रंथपाल डॉ. विठ्ठल जाधव, राष्ट्रीय सेवा योजना प्रमुख डॉ. विशाल वर्मा, प्रा. डॉ. रूपा गिल्डा यांची प्रमुख उपस्थिती होती. करिअर कट्टा महाविद्यालयीन समन्वयक प्रा. अजय चव्हाण यांनी विद्यार्थ्यांना उपक्रमाबाबत सविस्तर माहिती दिली. करिअर कट्टा समितीतील प्रा. क्षितिज कांबळे, प्रा. सिद्दिका पटेल, प्रा. ज्योती महावरकर तसेच प्रशासकीय कर्मचाऱ्यांनी कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी मोलाचे सहकार्य केले

# शिक्षकांच्या कलागुणांना व्यासपीठ : दयानंद कला महाविद्यालयात विभागस्तरीय स्पर्धा

**लातूर/प्रतिनिधी :** राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे तसेच जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, मुरुड (ता. जि. लातूर) यांच्या वतीने शिक्षक, अधिकारी व कर्मचारी यांच्यासाठी शैक्षणिक वर्ष २०२५२६ पासून विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे. त्याअंतर्गत २०२५२६ या वर्षासाठीच्या विभागस्तरीय स्पर्धा दयानंद कला महाविद्यालय, लातूर येथे शुक्रवार, दिनांक २६ डिसेंबर २०२५ रोजी उत्साहात संपन्न झाल्या.



या स्पर्धांमध्ये राज्य मंडळाच्या अधिनस्त सर्व शासकीय, स्थानिक स्वराज्य संस्था, अनुदानित व अंशतः अनुदानित प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी तसेच शिक्षण विभागाच्या पर्यवेक्षीय यंत्रणेतील अधिकारी व कर्मचारी सहभागी झाले होते. लातूर, नांदेड व धाराशिव जिल्ह्यांतील तालुकास्तरीय स्पर्धांतून गुणवत्तेनुसार निवड झालेल्या स्पर्धकांची विभागीय स्पर्धा घेण्यात आली. यामध्ये प्रत्यक्ष सादरीकरणासाठी ८० तर ऑनलाईन पद्धतीने ४० स्पर्धक सहभागी झाले. विभागीय स्पर्धांमध्ये वैयक्तिक फोटोग्राफी, पोस्टर, प्रवासवर्णन, पुस्तक परीक्षण, व्हिडिओ निर्मिती, डॉक्युमेंटरी आदी विविध कलाप्रकारांचा समावेश होता. या स्पर्धांचे आयोजन डायटचे प्राचार्य डॉ. मारुती सलगर यांच्या मार्गदर्शनाखाली दयानंद कला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवाजी गायकवाड यांच्या सहकार्याने करण्यात आले. स्पर्धा समन्वयक अधिव्याख्याता प्रा. अनिल जाधव तसेच उपप्राचार्य डॉ. दिलीप नागरगोजे यांनी संयोजनाची जबाबदारी सांभाळली.

या स्पर्धेत सादर झालेल्या पोस्टर स्पर्धेची पाहणी प्राचार्य डॉ. शिवाजी गायकवाड यांनी केली. तीनही जिल्ह्यांतून नियुक्त करण्यात आलेल्या तज्ज्ञ परीक्षकांनी विविध कलाप्रकारांतील सादरीकरणांचे परीक्षण करून राज्यस्तरीय स्पर्धेसाठी स्पर्धकांची निवड केली.

या आयोजनासाठी डायटचे वरिष्ठ अधिव्याख्याता डॉ. विजयकुमार सायगुंडे, डॉ. जगन्नाथ कापसे, डॉ. अंजली सूर्यवंशी, अधिव्याख्याता श्री घनश्याम पोळे, श्रीमती निलोफर पटेल, श्रीमती सुचित्रा जाधव, गिरीश माने, श्री किशोर सोनवणे, डॉ. संदिपान जगदाळे, प्रा. अरीफ शेख तसेच विषयतज्ज्ञ व विषयशिक्षक यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

# डॉ. पंजाबराव देशमुख हे शेतकऱ्यांचे कैवारी होते : डॉ. गुणवंत बिरादार

**लातूर/प्रतिनिधी :** भारत हा कृषीप्रधान अर्थव्यवस्थेचा देश आहे. डॉ. पंजाबराव देशमुख यांनी शेती आणि शेतकऱ्यांना समृद्धदे करणारे धोरणे तयार करण्यासाठी आणि अंमलबजावणीसाठी त्यांनी आपली प्रतिभा ऊर्जा समर्पित केली त्यामुळे ते गरीब शेतकऱ्यांची बाजू मांडणारे शेतकऱ्यांचे कैवारी होते असे प्रतिपादन डॉ. गुणवंत बिरादार यांनी केले.

महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्था, लातूर द्वारा संचलित महात्मा बसवेश्वर महाविद्यालयात जयंती उत्सव समिती आणि कार्यालयाच्यावतीने डॉ. पंजाबराव देशमुख यांची जयंती साजरी करण्यात आली यावेळी ते प्रमुख मार्गदर्शक म्हणून बोलत होते.



कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य प्रोफेसर डॉ. आनंद शेवाळे हे होते तर कनिष्ठ महाविद्यालयाचे पर्यवेक्षक प्रा. नितीन वाणी, डॉ. दिनेश मौने, डॉ. यशवंत वळवी, डॉ. संजय गवई, डॉ. सदाशिव दंदे, डॉ. रत्नाकर बेडगे, डॉ. विनायक वाघमारे, डॉ. दीपक चाटे, प्रा. माधव नायणे, प्रा. केशव सूर्यवंशी, कार्यालय प्रमुख नामदेव बेंदर्गे यांची उपस्थिती होती.

कार्यक्रमाच्या प्रारंभी डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या प्रतिमेला प्रभारी प्राचार्य प्रोफेसर डॉ. आनंद शेवाळे यांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.

अध्यक्षीय समारोप प्रोफेसर डॉ. आनंद शेवाळे यांनी केला. सूत्रसंचालन नामदेव बेंदरगे यांनी केले तर आभार डॉ. संजय गवई यांनी मानले. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी अजय गायकवाड, शिवशंकर खुब्बा आणि गुरुप्रसाद बिरादार यांनी परिश्रम घेतले.

प्रो. जडे यांचे रबरी शिक्के
कॉम्प्युटर नॉयलॉन रबर असलेले
टिकाऊ रबरी शिक्के
तयार करून मिळतील.




शाखा १.
जडे-भारत प्रिंटींग प्रेस, मेनरोड, लातूर
शाखा २.
जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्र नगर, लातूर
संपर्क: (०२३८२) २४२६०८,२४५४०९

# ई - न्यायालयीन प्रणाली प्रशिक्षण कार्यक्रम संपन्न !



कळंब (प्रतिनिधी)-येथील जिल्हा व सत्र न्यायालयात दि .२५ डिसेंबर रोजी ई - न्यायालयीन प्रणाली प्रशिक्षण कार्यशाळा संपन्न झाली . या कार्यशाळेचे आयोजन जिल्हा न्यायालयाच्या इमारतीमध्ये आयोजन करण्यात आले होते . या न्यायालयात प्रशिक्षणाच्या कार्यक्रमाचे अध्यक्ष दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर श्री पी. आर . कुलकर्णी तसेच दुसरे मार्गदर्शक न्यायाधीश श्रीमती ए. डी . जाधव यांच्या प्रमुख उपस्थितीत न्यायालयीन प्रणाली प्रशिक्षण कार्यक्रम संपन्न झाला . या कार्यक्रमात येणाऱ्या काळात संपूर्ण डाटा ऑनलाइन कसा करावा या विषयावर प्रात्यक्षिक सह मार्गदर्शन करण्यात आले . यात ॲड. एस . आर . आगलावे व ॲड. ए .पी . कोल्हे यांनी याविषयी सखोल मार्गदर्शन केले . या कार्यक्रमाची

प्रस्तावना व आभार प्रदर्शन विधिज्ञ मंडळाचे अध्यक्ष ॲड. बी .बी . साठे यांनी केले तर या कार्यक्रमासाठी वरिष्ठ व कनिष्ठ विधीज्ञ मंडळी मोठ्या संख्येने या कार्यशाळेला उपस्थित होते . कार्यक्रम पार पाडण्यासाठी न्यायालयीन कर्मचारी व त्यांचे सहकारी यांनी परिश्रम घेतले .

# सोने लाखाच्या पुढे, चांदी दोन लाख पार; मकरसंक्रांतीपूर्वी बाजारात शांतता

परंडा (प्रतिनिधी)- आंतरराष्ट्रीय बाजारातील अस्थिरतेमुळे सोने आणि चांदीच्या दरांनी पुन्हा एकदा नवे उच्चांक गाठले असून, याचा थेट परिणाम आगामी मकर संक्रांतीच्या खरेदीवर होण्याची शक्यता आहे. दरवाढीमुळे ग्राहकांनी खरेदीकडे पाठ फिरवली असून, परंडा तालुक्यासह परिसरातील सराफ बाजारात सध्या शुकशुकाट पसरला आहे. डिसेंबर महिन्यात सोन्याच्या दरात पुन्हा मोठी उसळी पाहायला मिळाली आहे. सध्या २४ कॅरेट सोने प्रति तोळा १ लाख ३१ हजार ५०० रुपये असून, करासह हा दर १ लाख ३५ हजार ४४५ रुपयांवर पोहोचला आहे. तर चांदी प्रति किलो २ लाख ३ हजार रुपये असून, करासह २ लाख ९ हजार रुपये इतका दर झाला आहे. मागील काही दिवसांपासून सोने-चांदीच्या दरात सातत्याने वाढ होत आहे. सराफ व्यावसायिकांच्या मते, आंतरराष्ट्रीय पातळीवरील घडामोडी, ट्रम्प टॅरिफ टॅक्सची चर्चा, तसेच विविध देशांच्या नॅशनल बँकांकडून मोठ्या प्रमाणावर सोन्याची खरेदी सुरू असल्यामुळे दरवाढ होत आहे.

याशिवाय ग्राहकांकडून २४ कॅरेट बिस्किट, कॉइन व गोल्ड बारमध्ये गुंतवणूक वाढली आहे. जागतिक बाजारातील अस्थिरतेमुळे संपूर्ण देशात सुरक्षित गुंतवणूक म्हणून सध्याच्या परिस्थितीत सोने व चांदीतील गुंतवणूक सुरक्षित चीन, रशिया, इंडोनेशिया सारखे देश मोठ्या प्रमाणात सोने खरेदी करत आहेत. जागतिक स्तरावर युद्धजन्य परिस्थितीमुळे तसेच ट्रम्प टॅरिफ टॅक्सच्या धोरणामुळे आंतरराष्ट्रीय स्तरावर अनिश्चिततेचे वातावरण आहे. अनेक कारणांमुळे अशा परिस्थितीत लोकांना सोने व चांदीतील गुंतवणूक सुरक्षित वाटत आहे. दरम्यान दिवसेंदिवस सोने-चांदीचे भाव वाढत असल्याचे दिसून येत आहे. सोने-चांदीची मोठ्या प्रमाणात खरेदी होत आहे. गुंतवणुकीच्या दृष्टीने सोन्याने आतापर्यंत ग्राहकांना चांगला परतावा दिला आहे. त्यामुळे आगामी एक ते दोन वर्षांत सोन्याचा दर प्रति तोळा १ लाख ७५ हजार रुपये, तर चांदीचा दर प्रति किलो २ लाख ५० हजार रुपयांपर्यंत जाण्याची शक्यता असल्याचे सराफ व्यापारी सांगत आहेत. मात्र, या दरवाढीचा फटका छोट्या सराफ दुकानदारांना, कारागिरांना आणि मध्यमवर्गीयांना बसण्याची शक्यता आहे. सध्या बाजारात सामान्य ग्राहक एक, दोन किंवा पाच ग्रॅमपेक्षा अधिक खरेदी करत नसल्याने उलाढाल मोठ्या प्रमाणात घटली आहे.

अशीच परिस्थिती कायम राहिल्यास काही छोट्या दुकानदारांवर दुकान बंद करण्याची वेळ येऊ शकते, अशी भीती व्यक्त होत आहे. दरम्यान, चांदीचा वापर सौर पॅनल, मोटी वाहने, संगणक, मोबाईल व इतर आधुनिक तंत्रज्ञानातील उपकरणांमध्ये मोठ्या प्रमाणात होत आहे. चांदीची विद्युत वाहक क्षमता अधिक असल्याने तिची मागणी सातत्याने वाढत आहे. या सर्व कारणांमुळे आगामी काळात सोने आणि चांदीच्या दरात आणखी अनपेक्षित वाढ होण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे.

# स्पर्धेच्या मूल्यांकनासाठी जि.प.प्रशालेला युनिसेफ पथकाची भेट: उमरगा जिल्हा परिषद शाळेला राज्यस्तरीय हरित व स्वच्छता गौरव



उमरगा(प्रतिनिधी)-शहरातील आयएसओ मानांकित जिल्हा परिषद प्रशालेला सन २०२५ मध्ये राज्यस्तरीय स्वच्छ व हरित विद्यालय स्पर्धेमध्ये मानांकन मिळाले आहे. या स्पर्धेच्या मूल्यांकनासाठी युनिसेफ या जागतिक संस्थेच्या राम कोलगुडे यांच्या मार्गदर्शनाखालील पथकाने शाळेला नुकतीच भेट देवून पाहणी केली.

दरम्यान शाळेच्या भौतिक सुविधा, परसबाग, मियावाकी जंगल निर्मिती, पाणी तपासणी अहवाल, स्वच्छतागृहे, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, हँडवॉश स्टेशन, शाळा अन शालेय परिसराची स्वच्छता, विद्यार्थी स्वच्छता सवयी, रेन वॉटर हार्वेस्टिंग, कचरा व्यवस्थापन एकूण शालेय वातावरण यांचे सखोल मूल्यांकन करण्यात आले. युनिसेफच्या पथकाने शाळेच्या प्रगतीबाबत व भौतिक सुविधांबाबत समाधान व्यक्त केले असून काही मार्गदर्शक सूचनाही दिल्या. गटशिक्षणाधिकारी अमोल राजपूत यांच्या मार्गदर्शनाखाली मुख्याध्यापक पद्माकर मोरे व केंद्रप्रमुख शिला मुदगडे यांनी शाळेची माहिती पथकाला दिली.

या उपक्रमासाठी सह-शिक्षक नागेश स्वामी, धनराज तेलंग, विद्यानंद सुत्रावे, बशीर शेख, सदानंद कुंभार, संजय रूपाजी, प्रवीण शिंदे, सोनाली मुसळे, भाग्यश्री पंडित व वर्षाराणी पाटील यांनी विशेष परिश्रम घेतले. स्वच्छ व हरित विद्यालय पुरस्कारासाठी राज्यस्तरावर मानांकन मिळवणारी तालुक्यात जिल्हा परिषद प्रशाला पहिलीच शाळा ठरली आहे. या यशाबद्दल शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष शकुंतला मोरे, शिक्षणतज्ज्ञ सदानंद शिवदे-पाटील, अशोक पतंगे, अमर वरवटे, सर्व शालेय व्यवस्थापन समिती सदस्यांनी प्रशालेचे मुख्याध्यापक व शिक्षकांचे अभिनंदन केले.

# तुळजापूरमध्ये लाखावर भाविक भाविकांची गर्दी वाढली



तुळजापूर(प्रतिनिधी)- नाताळ सुटीच्या पार्श्वभूमीवर सलग दुसऱ्या दिवशी शुक्रवारी (दि. २६) लाखावर भाविकांनी तुळजाभवानी चरणी माथा टेकला. दिवसभर दर्शन मंडपाचे सर्व मजले भरले होते. स्पेशल दर्शनची रांग प्रांगणात गेली होती. दरम्यान यावेळी महाद्वारमधून प्रवेश बंद असल्याचे माहित नसल्याने बहुतांश भाविक महाद्वाराकडेच येत होते. तेथे त्यांना महाद्वारावरच बाहेरून दर्शन घेऊन समाधान मानावे लागले. शुक्रवारी पहाटेपासूनच दर्शन मंडपाचे सर्व मजले भाविकांनी भरले होते. मंदिर संस्थानने दर्शनरांगेत अधिकारी, कर्मचारी तैनात केल्याने दर्शनरांगेला गती आली होती. गर्दीमुळे शुक्रवारी धर्म दर्शनाला तीन तास तर मुख दर्शनाला तासभर वेळ लागत होता. ५०० रुपयांच्या स्पेशल दर्शनाची रांग प्रांगणात गेल्याने स्पेशल दर्शनाला तासभर वेळ लागत होता. दरम्यान दुपारी चारनंतर स्पेशल दर्शनरांग रिकामी झाली होती. गर्दीच्या पार्श्वभूमीवर २५ डिसेंबर ते ४ जानेवारी या कालावधीत सशुल्क दर्शन व रेफरल दर्शन पास बंद करण्यात आले आहेत.

# जुगार विरोधी कारवाई

धाराशिव (प्रतिनिधी)- आनंदनगर पोलीस ठाणे अंतर्गत जुगार विरोधी कारवाई दरम्यान आनंदनगर पोलीसांनी दि.२६.१२.२०२५ रोजी आनंदनगर पो ठाणे हद्दीत नगरपालीकेचे समोरील रोडलगत छापा टाकला. यावेळी सय्यद सांजा वेस गल्ली धाराशिव ता. जि. धाराशिव हे नगरपालीकेचे समोरील रोडलगत कल्याण मटका जुगाराचे साहित्या एकुण ८५० रक्कम स्वत:चे कब्जात बाळगलेले आनंदनगर पो. ठाणेच्या पथकास आढळले. नमूद व्यक्तीविरुध्द महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक कायदा कलम अन्वये आनंदनगर पो ठाणे येथे गुन्हा नोंदवला आहे.

# नववर्षाची सुरुवात आरोग्यदायी करण्यासाठी कथले युवक आघाडी च्या आरोग्यदायी उपक्रम

कळंब (प्रतिनिधी):- नववर्षाची सुरुवात आरोग्यदायी होण्यासाठी स्व. गणपतरावजी कथले युवक आघाडी च्या वतीने प्रतीवर्षी प्रमाणे कळंब मॅरेथॉन स्पर्धेचे आयोजन होत असल्याने सगळीकडे उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे कळंब चे ऐक्य दाखवण्यासाठी आता कळंबकर धावणार आहेत.

गेल्या ७ वर्षांपासून या स्पर्धेचे आयोजन करण्यात येते या स्पर्धेमध्ये महाराष्ट्रातून स्पर्धक सहभाग नोंदवत असतात आता पर्यंत १५० च्या वर नाव नोंदणी झाली आहे.

शहरातील नगर परिषद शाळा क्रमांक-१ येथून स्पर्धा सुरुवात होणार असून छत्रपती शिवाजी महाराज चौक ते लक्ष्मी रोड मार्गे डिकसळ येथील केंब्रिज स्कूल पर्यंत स्पर्धा असणार आहे हे तबल अडीच किलोमिटर अंतर असणार आहे.या बक्षीसाचे प्रायोजक श्री शहीद भगतसिंग गणेश मंडळ व कथले युवक आघाडी वतीने करण्यात येणार आहे .५ गटा मध्ये ही स्पर्धा होणार आहे तरी सर्व इच्छुक स्पर्धकांनी आपली नाव नोदणी ऑनलाईन स्वरूपात करावी व ८८०८६९१४३ यश सुराना या नंबर वर नोंदणी करू शकता असे आवाहन स्व. गणपतरावजी कथले युवक आघाडीच्या वतीने करण्यात आले

५ गटा मध्ये ही स्पर्धा होणार

मॅरेथॉन स्पर्धा ही पाच गटामध्ये होणार गट क्र.१ला

६ ते १५ वर्ष मुली, गट क्र.२ वय ६ ते १५ वर्ष मुले, गट ३ खुला पुरुष , गट ४खुला महिला, गट ५वा वय ४५ च्य पुढील स्पर्धक असून प्रथम, दुतिय, तृतीय बक्षीस व सन्मान चिन्ह देण्यात येणांर आहे

**स्पर्धकांची संख्या वाढणार**

कळंब शहरात मागील आठ वर्षापासून स्पर्धा सुरू करण्यात आली आहे. मागील वर्षी ४०० स्पर्धक सहभाग नोदवला होता या वर्षी संख्या वाढण्याची शक्यता असल्यामुळे आयोजन जोरदार करण्यात येणार आहे.

तरी सर्वांनी जास्तीत जास्त सहभाग नोंदवावा असे विनंती करण्यात येत आहे.

# मोटरसायकल ट्रॅक्टरला समोरुन धडकून गंभीर जखमी होवून मयत

उमरगा (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत मयत नामे- आकाश विद्यासागर भुरे, वय २५ वर्षे, रा. केसरजवळगा ता. उमरगा हे दि.१४.१२.२०२५ रोजी बुलेट मोटरसायकल वरुन जात होते. दरम्यान चौरस्ता ते आळंद जाणारे रोडवर पेपर मिल जवळ ट्रॅक्टर चा चालकाने त्याचे ताब्यातील ट्रॅक्टर हा हायगयी व निष्काळजीपणे रोडवर कसल्याही प्रकारचे इंडिकेटर व दिशा फलक न लावता रोडवर उभा केल्याने आकाश भुरे यांची मोटरसायकल ट्रॅक्टरला समोरुन धडकून गंभीर जखमी होवून मयत झाले. तर जखमी नामे- चंद्रकांत आणाप्पा चिंचोले, रा. आळंगा यांची मोटरसायकल क्र एमएच १२ बीटी ४६९४ ही ट्रॅक्टरला पाठीमागून धडकून गंभीर जखमी झाले. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे-रेवाप्पा विद्यासागर भुरे यांनी दि.२६.१२.२०२५ रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन उमरगा पो ठाणे येथे गुन्हा नोंदवला आहे. पोलिस अधिक तपास करीत आहेत.


**महाराष्ट्र शासन**

**गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ, छत्रपती संभाजीनगर.**

**जलसंपदा विभाग**

**(महाराष्ट्र शासनाचा अंगीकृत उपक्रम)**

**कार्यकारी अभियंता, उपसा सिंचन विभाग, धाराशिव यांचे कार्यालय, आनंद नगर, सिंचन भवन, धाराशिव.**

E-mail :- eelisdn@gmail.com दूरध्वनी क्र.०२४७२-२९५१७१

## ई-निविदा सूचना क्र- ०६ सन २०२५-२६ (ऑनलाईन)

महाराष्ट्र राज्याच्या राज्यपालांच्या वतीने **कार्यकारी अभियंता, उपसा सिंचन विभाग, धाराशिव,** जलसंपदा विभाग, महाराष्ट्र शासन हे सक्षम निविदाकारांकडून खालील कामाकरीता ई-निविदा प्रणालीव्दारे (ऑनलाइन) निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्रे शासनाचे संकेतस्थळ https://mahatenders.gov.in येथून डाउनलोड करण्यात यावीत. सविस्तर निविदा सूचना व ई निविदेबाबत सर्व माहिती शासनाच्या संकेतस्थळावर व विभागीय कार्यालयाच्या सूचना फलकावर उपलब्ध आहे.

निविदा स्वीकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार **कार्यकारी अभियंता, उपसा सिंचन विभाग, धाराशिव,** यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्वीकारली जाणार नाही. सदर निविदा सूचनेमध्ये काही बदल होत असल्यास https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर कळविण्यात येईल.

| | | |
|---|---|---|
| १. | कामाचे नांव व किमत :- | कृ.म.सिं.प्र.उ.सिं.यो. क्र. 1 अंतर्गत इराचीवाडी गुरूत्वीय नलिका भूम ते ईट रस्त्यास छेदणाऱ्या ठिकाणी वळण रस्ता करणे व नलिका क्रॉसिंगमुळे बाधित मूळ रस्त्याचे पुर्ववत बांधकाम करणे ता. भूम जि. धाराशिव (₹**42.34 लक्ष**) .GST वगळून |
| २. | कामाचे नांव व किंमत :- | कृ.म.सिं.प्र.उ.सिं.यो.1 टप्पा 2 मधील सोनारी साकत जोड कालव्यावर सा.क्र. 8800 मी., सा.क्र. 11080 मी. येथे Foot Bridge चे बांधकाम करणे. (₹**49.37 लक्ष**) .GST वगळून |
| ३. | कामाचे नांव व किंमत :- | धाराशिव पाटबंधारे मंडळ धाराशिव अंतर्गत क्षेत्रिय कामाकरीता बाह्य यंत्रणेमार्फत कंत्राटी निरीक्षण वाहाने भाडेतत्त्वावर घेणे (₹**84.72 लक्ष**) .GST वगळून |
| ४. | ई-निविदा संचाची किमत:- | **प्रत्येकी रु.2360/- (GST सह)** |
| ५. | ईसारा/बयाना रक्कम:- | **वरील अ.क्र.1 ते 3 या कामाची संबंधित माहिती महाटेंडर या संकेतस्थळावर सविस्तर निविदा सुचने (NIT) मध्ये देण्यात आलेली आहे.** |
| ६. | काम पूर्ण करण्याचा कालावधी :- | |
| ७. | कंत्राटदाराचा नोंदणी वर्ग:- | |

१. ई निविदा उपलब्ध कालावधी दि. 29/12/2025 ते दि.05/01/2026
२. ई निविदा उघडणे दिनांक 07/01/2026 रोजी शक्य असल्यास किंवा त्यापुढे
३. खालील संकेतस्थळावर ई निविदा बाबत सर्व माहिती उपलब्ध आहे. https://mahatenders.gov.in
४. कार्यकारी अभियंता, उपसा सिंचन विभाग, धाराशिव यांचे कार्यालयातील सूचना फलक.

**जा.क्र/उसिंवी/निविदा/3346/2025**
कार्यकारी अभियंता, उपसा सिंचन विभाग, धाराशिव यांचे कार्यालय. **दिनांक:- 23/12/2025**

**स्वाक्षरीत/-**
**कार्यकारी अभियंता**
**उपसा सिंचन विभाग, धाराशिव**


# सुरट मटका जुगाराचे साहित्य पोलिसाने केले जप्त

कळंब (प्रतिनिधी)-पोलीस ठाणे अंतर्गत जुगार विरोधी कारवाई दरम्यान कळंब पोलीसांनी दि.२६.१२.२०२५ रोजी कळंब पो ठाणे हद्दीत मोहा येथे दर्गाच्या पाठीमागील बाजूस छापा टाकला. यावेळी रोहिणी रा. गोलेगाव ता. भुम जि. धाराशिव ह.मु. मोहा ता. कळंब जि. धाराशिव हे १५.१० वा. सु. मोहा येथे दर्गाच्या पाठीमागील बाजूस सुरट मटका जुगाराचे साहित्या एकुण १,२१५ रक्कम स्वत:चे कब्जात बाळगलेले कळंब पो. ठाणेच्या पथकास आढळले. यावरुन पोलीसांनी कळंब पो ठाणे येथे गुन्हा नोंदवला आहे.


**लातूर समाचार धाराशिव**

**बातम्या,लेख व जाहिराती साठी संपर्क**

**9422472502**
**9175325708**


## धाराशिव शहरातील कांही महत्वाचे फोन नंबर

१) रुग्णवाहिका २२३९७६
२) रक्तपेढी २२३९७६
३) जिल्हा रुग्णालय २२६९२७
४) शहरपोलिस स्टेशन२४०९९९
५) अग्नीशामक विभाग २२२१०१
६) रेल्वेस्टेशन २४०९९९
७) एसपी कार्यालय २२७६२०
८) जिल्हाधिकारी का.२२४५०१
९) तहसिल का. २२७८८२
१०) जि.प. २२५४०७
११)नगरपरिषद २२५४०७
१२)जिल्हा माहिती अधिकारी ०२४७२-२२२७४४
१३) जिल्हा उद्योग केंद्र (डीआयसी) ०२४७२-२२२२२६
१४) उस्मानाबाद जिल्ह्याचे उपसंचालक ०२४७२-२२७८ १ २
१५) उप विभागीय वन कार्यालय, उस्मानाबाद ०२४७२-२२३४०८
१६)अधीक्षक उत्पादन शुल्क कार्यालय ०२४७२-२२३३८७
१७) जिल्हा कल्याण अधिकारी ०२४७२-२२२०१४
१८) प्रादेशिक परिवहन अधिकारी (आरटीओ) ०२४७२-२२२५५५
१९) मुख्य पोस्ट ऑफिस ०२४७२-२२२२१४
२०) जिल्हा रोजगार अधिकारी ०२४७२-२२२२३६
२१) विभागीय नियंत्रक (एमएसआरटीसीसी) ०२४७२-२२२२१६
२२) लातूर समाचार ९४२२४७२५०२
बीडीओ, एम.आर.ए.जी.एस. जिल्हा परिषद ०२४७२-२२०६११
२३)मुख्य कार्यकारी अधिकारी ०२४७२-२२६८४० २४)
२४) अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी ०२४७२-२५) २२३३९७ प्रकल्प संचालक ०२४७१-२२१५५२
२५) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन) ०२४७२-२२३३८८
२६) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्राम पंचायत) ०२४७२-२२३३४३
२७) उप मुख्य कार्यकारी अधिकारी (स्त्री व मुल) ०२४७२-२२२५७०
२८) मुख्य खाते व वित्त अधिकारी ०२४७२-२२२१३२
२९) शिक्षण अधिकारी (प्राथमिक) ०२४७२-२२४१८४
३०) शिक्षण अधिकारी (माध्यमिक) ०२४७२-२२४१८४


सांज दैनिक लातूर समाचार हे मुद्रक,प्रकाशक,संपादक व मालक दयानंद शंकर जडे, यांनी जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्रनगर, लातूर येथे छापून समर्थनगर धाराशिव येथे प्रकाशित केले आहे.

Evening Daily Latur Samachar is Published by Dayanand Shankar Jade from Samarth Nagar,Dharashiv on behalf of Dayanand Shankar Jade ,edited by Dayanand Shankar Jade and Printed by Dayanand Shankar Jade at Jade Offset Printers,Mitra Nagar,Latur. Editor : Dayanand Shankar Jade Mob:9422472502 RNI- MAHMAR/2003/11649